दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ७ वे अंक –२६ | रविवार दि.०४ ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-7th | Issue-26 | Sunday, Dt.04 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सर्व सुट्ट्या रद्द, मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा निर्णय

राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. यावर्षी केवळ दोन महिनेच पाऊस झाला. त्यानंतरचे दोन महिने पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांनी पिकं पेरलेली होती. पण पाऊस न आल्याने ती पिकं उद्धवस्त झाली. पेरणीत पैसा वाया गेला. त्या पार्श्वभमिवर शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता या निर्णयानंतर राज्याच्या महसूल विभागानेही मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता सुट्ट्या मिळणार नसल्याचा हा मोठा निर्णय असून, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची माहिती दिली आहे.

शेतकऱ्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या सर्व सुट्ट्या रद्द करण्याचं जाहीर करण्याच आलं आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबद्दलचा निर्णय जाहीर केलाय. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज चंद्रशेखर बावनकुळे हे राज्यामध्ये दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करत आहेत. आज ते अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भेटी घेत आहेत. या दौऱ्यामध्ये शेतकरी बांधवांशी चर्चा केली. यावेळी दुष्काळाची पाहणी केली. यावेळी अकोला येथे विविध विषयांवरील मागण्यांची निवेदने घेऊन आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. सर्वांच्या मागण्या समजून घेऊन त्याबाबत तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

दरम्यान, राज्यामध्ये एकूण ३५८ तालुक्यांपैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री फडणवीसांच्या नेतृत्त्वाखालील राज्य सरकारने हा महत्त्वाचा निर्णय २६ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर केला आहे. राज्यातले ७५ टक्के तालुके दुष्काळाच्या कचाट्यात सापडले आहेत.पावसाची स्थिती गंभीर बनल्याने राज्य सरकारने संबंधित तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती घोषित केली आहे. पावसाच्या दडीनंतर शेतीवर झालेल्या परिणामांचा विचार करून निकष ठरवण्यात आलेले आहेत. त्यानंतर ट्रिगर १ लागू झालेल्या २६ ५ तालुक्यांमध्ये हा दुष्काळ जाहीर झाला.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी जाहीर केलं आहे की, दुष्काळाचा फटका बसलेल्या इतर तालुक्यांनाचा अभ्यास करून त्यांनाही ट्रिगर१ मध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि त्यांनाही दुष्काळग्रस्त तालुके म्हणून घोषित करण्यात येईल.

## हिंगोली भूकंपाच्या पार्श्वभूमीवर..

### नागरिकांनी घाबरून जाऊ नये,अफवांवर विश्वास ठेवू नये – पालकमंत्री नरहरी झिरवाळ

हिंगोली (जिमाका)

हिंगोली जिल्ह्यात सकाळी भूकंपाचे दोन धक्के जाणवले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्ह्यातील परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली असून, जिल्हा प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे परिसरात सकाळी ९.४३ वाजता ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. या भूकंपाचे धक्के हिंगोली शहरासह जिल्ह्यातील विविध भागांत जाणवले. त्यापूर्वी औंढा नागनाथ तालुक्यातील गढाळा परिसरात सकाळी ७.४६ वाजता भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. या धक्क्याची नोंद ३.३ रिश्टर स्केल इतकी झाली.प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही भूकंपाच्या धक्क्यांमुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी पाहणी व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात येत आहे.नागरिकांनी घाबरून जाऊ नये. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अधिकृत माहितीसाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.हिंगोली जिल्ह्यात सकाळी भूकंपाचे दोन धक्के जाणवले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्ह्यातील परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली

## बीडमध्ये अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

### प्रतिबंधित गुटख्यासह पानटपरीवर गुन्हे, तर एका हॉटेलाचा परवाना निलंबित

बीड (जिमाका)

**जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाने प्रतिबंधित अन्न पदार्थांविरोधात मोठी मोहीम उघडली असून, प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार बीड शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला आहे. तसेच मानवी आरोग्याला घातक त्रुटी आढळून आल्यामुळे जालना रोडवरील एका चहा-नाश्ता सेंटरचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे.**

२४ सप्टेंबर २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने बशीरगंज येथील 'जमील पान सेंटर'वर अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान पानटपरीवर प्रतिबंधित गोवा आणि बाओबाजी पानम मसाल्यासह ५ हजार ६०८ रुपयांचा गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला. याप्रकरणी पानटपरीचालक सैयद मुशरत अली सैयद हमीद अली आणि विक्रेता शेख तोहिद अफसर यांच्याविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशाच प्रकारची दुसरी कारवाई त्याच दिवशी जिल्हा रुग्णालयासमोर असलेल्या कमाणी जवळील एका चहा व भजीच्या ठेल्यावर करण्यात आली. या ठिकाणी तपासणी केली असता खाकी रंगाच्या पुठ्यामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. या प्रकरणी ठेला चालक शेख माजेद शेख खालेद याच्याविरुद्धही बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. या भागात अवैध व प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

दुसऱ्या एका कारवाईत, २७ जुलै २०२६ रोजी जालना रोडवरील साठे चौक येथील 'मे. अप्पा चहा नाश्ता सेंटर'ची अन्न सुरक्षा पथकाने तपासणी केली. या तपासणीदरम्यान आस्थापनेमध्ये उंदराची विष्ठा, कीटक प्रतिबंधक व्यवस्थेचा अभाव, पिण्याच्या पाण्याच्या तपासणीचा अहवाल नसणे, भांडी धुण्याच्या जागेवरच अन्न शिजवणे, नॉन-फूड ग्रेड पिशव्या व वृत्तपत्राचा वापर, अवैध कृत्रिम रंगांचा वापर आणि कामगारांचे तंबाखू सेवन यांसारख्या मानवी आरोग्यास अत्यंत घातक असलेल्या गंभीर त्रुटी निष्पन्न झाल्या. त्यामुळे अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत या हॉटेलचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे.

सदरची ही धडक कारवाई छत्रपती संभाजीनगरचे सहआयुक्त (अन्न) श्री. करकाळे आणि अन्न व औषध प्रशासनाचे बीडचे सहायक आयुक्त नि. दि. मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी सी. सु. खंदारे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

## २४ तासांत लुटमार करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

### भोकरदन पोलिसांची कारवाई पाच आरोपी अटकेत विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

भोकरदन इसरारखान पठाण :- दगडवाडी येथे मोटारसायकल अडवून चाकूचा धाक दाखवत रोख रक्कम लुटणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा भोकरदन पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावला. या कारवाईत पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली असून एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. लुटलेली १२ हजार रुपयांची संपूर्ण रोख रक्कमही पोलिसांनी हस्तगत केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २ ऑक्टोबर रोजी गजानन कडबा वाघमारे वय ४४ रा. मलकापूर ता. भोकरदन हे दगडवाडी येथे दुष्काळ पाहणी कार्यक्रम पाहून मोटारसायकलवरून घरी जात होते. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या एर्टिगा कारमधून आलेल्या सहा जणांनी त्यांची मोटारसायकल अडवली. त्यानंतर आरोपींनी वाघमारे यांची गचांडी धरून चाकूचा धाक दाखविला आणि त्यांच्या पॅन्टच्या खिशातील १२ हजार रुपये बळजबरीने



काढून घेत घटनास्थळावरून पलायन केले.

या घटनेनंतर भोकरदन पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५३२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम ३१०(२), ११५(२), ३५२ व ३५१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष माने यांनी तपासाला गती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने गोपनीय माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करत आरोपींचा माग काढला.परभणी, जालना जिल्ह्यातील आरोपी

या कारवाईत रवि मारोती शिंदे वय २१, दत्तु प्रभाकर धोत्रे वय २०, कृष्णा रामचंद्र पारधे वय २५, राहुल रमेश जाधव वय १९ हे सर्व परभणी जिल्ह्यातील तसेच सचिन उर्फ राम शिवाजी शिंदे वय १९ रा. विरेगाव तांडा ता. जालना यांना अटक करण्यात आली. याशिवाय एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी आरोपींकडून लुटलेली १२ हजार रुपयांची संपूर्ण रक्कम हस्तगत केली आहे. या टोळीच्या इतर गुन्ह्यांतील सहभागाबाबतही तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.ही कारवाई पोलिस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलिस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर आणि प्रभारी अधिकारी संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके तसेच पोलिस अंमलदार प्रशांत उबाळे, लक्ष्मण रानगोते, संदीप भुतेकर, गणेश पिंपळकर, अर्जुन टेकाळे व संतोष बनकर यांच्या पथकाने केली.

## दुष्काळाच्या झळांनी पिके करपली

### तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी बांधावर जाऊन केली नुकसानीची पाहणी

धर्माबाद : ( अशोक पडोळे )

तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या पथकाने येताळा गावातील बाधित शेतशिवारात जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. सोयाबीन, कापूस तसेच इतर पिकांच्या नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्यात आले.

या पाहणी दौऱ्यात तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी, मंडळ अधिकारी श्रीमती अष्टुरे, येताळा तलाठी सचिन जावरकर, मुतन्याळ तलाठी प्रकाश जाधव, कृषी अधिकारी श्रीमती इरमलवार, येताळा कृषी सहाय्यक अशोक आरगे, पीकविमा प्रतिनिधी श्री. रेंगे तसेच पोलीस पाटील प्रताप जोगे सहभागी झाले होते.यावेळी येताळा ग्रामपंचायतीचे सरपंच तुळशिराम यंगलोड आणि ग्रामपंचायत कर्मचारी पोतन्ना जोगे यांच्यासह शेतकरी बालाजी यनगंटवार, संतोष आरगूलवार, गंगाधर सूर्यवंशी आदी शेतकरी उपस्थित होते.अधिकाऱ्यांनी शेतबांधावर जाऊन पिकांची अवस्था जाणून घेतली तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला. दुष्काळामुळे पिकांचे झालेले नुकसान पाहता शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. यावेळी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना धीर देत, शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. शासन आपल्या पाठीशी आहे. पंचनाम्याच्या आधारे नुकसानभरपाईसाठी प्रस्ताव तातडीने पाठविला जाईल, असे



आश्वासन दिले.

दुष्काळाच्या संकटात पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीची प्रतीक्षा आहे. त्यामुळे पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करून नुकसानभरपाईचा प्रस्ताव तातडीने पुढे पाठवावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## घुंगर्डे हादगावात ग्रामपंचायतीकडून धूर फवारणी

**डेंग्यूसदृश रुग्ण आढळल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाययोजना**

घुंगर्डे हादगाव बंडू शिंगटे

घुंगर्डे हादगाव येथे डेंग्यूसदृश रुग्ण आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीच्या वतीने शुक्रवारी दि. ३ गावात धूर फवारणी करण्यात आली. रोगराईचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायतीने ही प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेतली आहे.

गेल्या आठवड्यात गावात डेंग्यूसदृश रुग्ण आढळून आल्यानंतर ग्रामपंचायत प्रशासनाने तत्काळ दखल घेत गावातील विविध भागांत धूर फवारणी केली. डासांची उत्पत्ती व वाढ रोखण्यासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून ही फवारणी करण्यात आली.




गावात रोगराईचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असून नागरिकांनीही परिसरात स्वच्छता राखावी पाणी साचू देऊ नये असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले.यावेळी ग्रामसेवक धनंजय, ग्रामपंचायत कर्मचारी अशोक दोबाले, गणेश वाघ, बबन बिरले, संतोष खापरे, शिवसिंग पवार तसेच आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे माजी अध्यक्ष समीर काझी यांच्याबाबत बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करण्यास हायकोर्टाची अंतरिम मनाई

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर गुलामनबी काझी यांनी दाखल केलेल्या बदनामीच्या दाव्यात मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा अंतरिम आदेश दिला आहे. न्यायालयाने प्रथमदर्शनी उपलब्ध सामग्रीतील काही मजकूर हा बदनामीकारक असल्याचे निरीक्षण नोंदवत, पुढील आदेशापर्यंत संबंधित बदनामीकारक लेख, मजकूर अथवा त्यासारखी सामग्री प्रकाशित किंवा प्रसारित करण्यास प्रतिवादींना अंतरिम मनाई केली आहे. समीर काझी यांनी संबंधिताविरुद्ध १० करोड ५० लाख रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा केला आहे.सदर याचिका हायकोर्टाने दाखल करून घेत कडबाने,शेख बिलाल, खमरुल ईमान,जे.डी. शाह व भोकर येथील मकसूद गोंदवाले यांना मोठा दणका दिला आहे.

**पत्रकार कडबाने, खमरुल ईमान, शेख बिलाल, जे.डी. शाह यांना हायकोर्टाचा दणका, कागदपत्रे पाहूनच याचिका दाखल करून घेतली**

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे माजी अध्यक्ष समीर काझी यांच्याविरुद्ध जाणीवपूर्वक व कसलाही पुरावा नसतांना बदनामीकारक वृत्त प्रकाशित केल्याप्रकरणी बाळासाहेब कडबाने खमरुल ईमान, शेख बिलाल, जे.डी. शाह व भोकर येथील मकसूद गोंदवाले यांच्याविरूद्ध समीर काझी यांनी न्यायालयातअब्रुनुकसानीचा दावा दाखल केला.न्यायमूर्ती अरिफ एस. डॉक्टर यांच्या अध्यक्षतेखाली १ ऑक्टोबर २०२६ रोजी या प्रकरणाची सुनावणी झाली. समीर काझी यांनी दाखल केलेल्या दाव्यात विविध माध्यमांमधून आपल्याविरोधात कथित बदनामीकारक विधाने व आरोप करण्यात आल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यामध्ये वक्फ जमिनींच्या व्यवहाराबाबत गंभीर आरोप तसेच भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. यावेळी काझी यांच्या वतीने त्यांच्या विरोधात कोणतीही तक्रार किंवा एफआयआर दाखल नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला. तसेच काही वक्फ जमिनींबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ४ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या आदेशात संबंधित जमिनी वक्फ मालमत्ता नसल्याचे आणि काही व्यवहार काझी यांच्या जन्मापूर्वीच झाले असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. काझी यांना वक्फ मंडळाच्या अध्यक्षपदावरून हटवण्यात आले नसून त्यांचा कार्यकाळ संपल्यामुळे ते अध्यक्ष राहिले नसल्याचेही त्यांच्या वतीने न्यायालयात स्पष्ट करण्यात आले.न्यायालयाने प्रतिवादींच्या वकिलांना पुढील सुनावणीपर्यंत कथित बदनामीकारक सामग्रीचे प्रकाशन किंवा प्रसारण न करण्याबाबत भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले.यानंतर न्यायालयाने उपलब्ध नोंदी व सामग्रीचा विचार करून प्रथमदर्शनी अंतरिम दिलास्याचा आधार असल्याचे नमूद केले आणि अंतरिम अर्जातील संबंधित तरतुदीनुसार प्रतिवादींना कथित आक्षेपार्ह व बदनामीकारक लेख अथवा त्यासारखी सामग्री पुढे प्रकाशित किंवा पोस्ट प्रसारित करण्यास तात्पुरती मनाई केली. दरम्यान, प्रकरणात आणखी दोन पक्षकारांचा समावेश करण्यासाठी करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या अर्जालाही न्यायालयाने परवानगी दिली असून त्यासंदर्भातील दुरुस्ती नोंदवून घेण्यात आली आहे.

संपादकीय....

# शिक्षणाचे खासगीकरण कंपनीकरणाच्या दिशेने

ज्ञानाकडे जाण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षण व्यवस्था जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत समाजसुधारकांचे स्वप्न वास्तवात येण्याची शक्यता दिसत नाही, पण त्यासाठी समाजाने मोफत आणि दर्जेदार शिक्षणाचा आग्रह धरला पाहिजे, हे नक्कीच!

भारतात जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरण धोरण येण्यापूर्वीच शिक्षणाच्या खासगीकरणाची सुरुवात झाली होती. त्यानंतर तिचा वेग वाढविण्यात आला. शिवाय बिर्ला-अंबानी रिपोर्टनंतर तर हा वेग शंभर पटीने वाढला. कोरोनोत्तर काळात शिक्षणाची सूत्रे डिजिटल माध्यमांच्या हवाली करण्यात आल्याचे आपण पाहत आहोत. कोरोनाच्या मार्च २०२० नंतरच्या काळात डिजिटल सेवा देणाऱ्या गुगल, यूट्यूब, झूम यांसारख्या शेकडो प्स कंपन्यांच्या नफ्यात किती वाढ झाली हे पाहिले, तरी शिक्षणाचे कंपनीकरण कशाप्रकारे करण्यात आले, हे ध्यानात येईल.

एकेकाळच्या सधन शेतकऱ्याची जमीन कवडीमोल भावात विकायला बाध्य करून शेतीशिवाय शेतकरी हे धोरण राबवून शेतकऱ्याला मजुरामध्ये रूपांतरित केले जात आहे, त्याचप्रकारे शिक्षकांशिवाय शाळा आणि शिक्षकांशिवाय शिक्षण ही कल्पना भविष्यात आणली जात आहे.

# बीड जिल्ह्यात सुरक्षित अन्न व पोषक आहार समितीची बैठक संपन्न

बीड (जिमाका)

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सुरक्षित अन्न व पोषक आहार जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे पार पडली. या बैठकीमध्ये नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित अन्न व संतुलित आहार मिळावा यासाठी विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीत अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, याबाबतचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले आहेत. तसेच आगामी काळात शालेय विद्यार्थी आणि अंगणवाडीतील बालकांना मिळणाऱ्या 'मिड डे मील' (चळव ऊू चशरश्र) ची योग्य तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोषक व सुरक्षित अन्न पुरविण्यास उत्तेजन देऊन योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी संबंधितांना देण्यात आल्या.तसेच, आगामी सणासुदीच्या काळात अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही व मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉनन्स यांच्यासह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. के. पिंगळे, जिल्हा पुरवठा अधिकारी वधू प्रधाताटे, जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी प्रा. डी. आर. शिंदे, जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयीन प्रतिनिधी चंद्रकांत पांडव, जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेचे सचिन दोडके, अन्न सुरक्षा अधिकारी अ. भ. गाढे आणि अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त तथा समितीचे सदस्य सचिव नि. दि. मोहिते आदी



# चनकवाडी येथील महसूल अधिकाऱ्याकडून दुष्काळ पाहणी व पंचनामे

पैठण । प्रतिनिधी

चनकवाडी (ता. पैठण) येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पंचनामा केला.यावेळी महसूलचे तलाठी निकम आप्पा, कृषी अधिकारी विकास वाघमारे, ग्रामसेवक दांडगे यांनी विजय कदम गट क्रमांक १२९ यांच्या शेतात प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी करून पंचनामा करण्यात आला . तुर कापूस सोयाबिन बाजरी व इतर पिकांचे झालेले नुकसान, याची नोंद घेण्यात आली.

याप्रसंगी सरपंच भगवानराव कबाडी, चेअरमन अनिल मगरे, बबरु कदम, संजय मस्के, हरिभाऊ माने, सतीश मगरे, अर्जुन कदम, ज्ञानेश्वर बावणे, रवींद्र ससाने, दत्ता पाचे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर व्यथा मांडत तातडीने मदत मिळावी, अशी मागणी केली. पंचनाम्यानंतर अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले

# भारतीय डाक विभागातर्फे 'ढाई आखर' राष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन

बीड (जिमाका)

भारतीय डाक विभागामार्फत राष्ट्रीय स्तरावर 'ढाई आखर' या शीर्षकाखाली पत्रलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, बीड डाक विभागातही या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेचा विषय '- डर्शींशी ीं चींहशी एरींह : चू झीाळीश ीं झींशलीं छर्रीीश' असा असून, पत्र कोणत्याही भाषेत लिहिता येणार आहे. ही स्पर्धा १८ वर्षांपर्यंत आणि १८ वर्षांवरील अशा दोन गटांमध्ये होणार आहे. पत्रामध्ये आपले नाव, पत्ता व वयाचा उल्लेख असावा.

हे पत्र मुख्य पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई जीपीओ, मुंबई - ४००००१ यांच्या नावे लिहून डाकघरातील विशेष टपाल पेटीत टाकायचे आहे. पाकिटातील पत्रासाठी १००० शब्द आणि अंतर्देशीय पत्रासाठी ५०० शब्दांची मर्यादा आहे. पत्र पाठविण्याची शेवटची तारीख ३१ ऑक्टोबर २०२६ आहे.

राज्यस्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट पत्रांसाठी अनुक्रमे २५,०००/-, १०,०००/- व ५,०००/- रुपयांचे पारितोषिक तर राष्ट्रीय स्तरावर अनुक्रमे ५०,०००/-, २५,०००/- व १०,०००/- रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन डाक अधीक्षक एस. एन. आंबेडकर, बीड विभाग यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०२४४२-२२७०३५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत गांधी जयंती उत्साहात





अंबड । प्रतिनिधी

अंबड येथील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात संस्थेचे संचालक संजय जाधव सर यांनी महात्मा गांधी यांच्या सामाजिक कार्य सत्य अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच गांधीजींच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन समाजहितासाठी योगदान द्यावे असे आवाहन करण्यात आले.यावेळी संस्थेचे संचालक संजय जाधव सर,शिक्षक योगेश हरणे सर,अजय गाडेकर सर, संदीप पवार सर, संजय जाधव सर, शितल जाधव मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जयंतीचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## आमदार सुरेश धस यांच्या तत्परतेमुळे २ लाख रुपयांचा खर्च वाचला!

# सौताडा (भुरेवाडी) येथील भरत बर्डे यांच्यावर यशस्वी छातीची शस्त्रक्रिया

पाटोदा ।प्रतिनिधी

तालुक्यातील सौताडा (भुरेवाडी) येथील रहिवासी श्री. भरत अशोक बर्डे यांना वेळेवर मिळालेल्या वैद्यकीय आणि आर्थिक मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. अत्यंत गंभीर असलेल्या छातीच्या शस्त्रक्रियेचा सुमारे २ लाख रुपयांचा खर्च आमदार सुरेश धस यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे वाचला असून, त्यांच्यावर यशस्वी उपचार पूर्ण झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, भरत अशोक बर्डे यांना छातीचा गंभीर आजार असल्याने तातडीने शस्त्रक्रिया (ऑपरेशन) करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. या उपचारासाठी साधारण २ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. मात्र, बर्डे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने एवढा मोठा खर्च कसा करायचा, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला होता.

ही अडचण आणि परिस्थिती आमदार सुरेश धस यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखून आ. सुरेश धस यांनी तातडीने सूत्रे हलवली. त्यांनी आरोग्य विभागाचे स्वीय सहाय्यक ड. महेश बेदरे यांच्याशी संपर्क साधून शासकीय योजनेतून तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच पाटोदा येथील आपले स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनाही या प्रकरणी सतत पाठपुरावा करण्याचे



निर्देश दिले.

आमदार धस यांच्या सूचनेनुसार संबंधित वैद्यकीय यंत्रणेशी सातत्याने समन्वय ठेवून उपचाराची सर्व आवश्यक प्रक्रिया आणि कागदपत्रांची पूर्तता करून घेतली. या संपूर्ण प्रक्रियेत स्थानिक सरपंच बाळू घुले यांनीही मोलाचे सहकार्य केले.

सर्व यंत्रणेच्या वेळेवर झालेल्या या एकत्रित पाठपुराव्यामुळे भरत बर्डे यांच्यावर यशस्वीरीत्या छातीची शस्त्रक्रिया पार पडली. योग्य आणि मोफत उपचार मिळाल्याने बर्डे कुटुंबाचा तब्बल २ लाख रुपयांचा मोठा आर्थिक भार हलका झाला आहे.

आपल्यावर यशस्वी उपचार होऊन नवीन जीवन मिळाल्यानंतर भरत अशोक बर्डे आणि त्यांच्या कुटुंबाने आमदार सुरेश धस, व संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. जन लोकप्रतिनिधीच्या तत्परतेमुळे एका गरजू रुग्णाला वेळेवर आरोग्यदान मिळाल्याने परिसरातून समाधान व्यक्त होत आहे.

# मराठी ही केवळ संवाद आणि भाषा नव्हे, तर संस्कृती-इतिहासाची साक्षीदार

## डिजिटल युगात मराठीला ज्ञानभाषा करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई प्रतिनिधी

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपल्या समृद्ध संस्कृतीची वाहक आणि जाज्वल्य इतिहासाची साक्षीदार आहे. विपुल शब्दसंपदा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विविध बोलीभाषांचा वारसा लाभलेल्या मराठीला २१ व्या शतकात डिजिटल आणि ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मराठीचा दैनंदिन व्यवहारातील वापर वाढविण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), डिजिटल तंत्रज्ञान, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' आणि 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' कार्यक्रमाचा चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकर्सी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी उपस्थित होते.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हा अभिमानाचा क्षण...

मराठी भाषा प्राचीन आणि अभिजात आहेच मात्र तिला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेची अधिकृत मान्यता मिळणे हा मराठी भाषकांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या भाषिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय पातळीवर विशेष अधोरेखित स्थान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संकल्पनेसोबत स्वभाषेलाही महत्त्व दिले. राज्यकारभारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातून मराठीच्या प्रशासकीय वापराला नवी दिशा मिळाली, अशी आठवणही फडणवीस यांनी यावेळी करून दिली.

जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा १३ वा क्रमांक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठी ही जागतिक स्वरूपाची भाषा आहे. विसाव्या शतकात तयार झालेल्या मराठी ज्ञानकोश आणि शब्दरत्नाकरामध्ये ११ ते १३ लाख शब्द असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तुलनेत ऑक्सफर्ड शब्दकोशात सुमारे सहा लाख शब्द, तर मँडरिन, स्पॅनिश आणि फ्रेंचसारख्या भाषांमध्ये साधारण तीन ते साडेतीन लाख शब्द असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द आहेत. त्याच्या पुढील आवृत्त्या तयार करून शब्दसंपदा १३ लाख शब्दांपर्यंत नेण्याचे काम करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली.

डिजिटल तंत्रज्ञानामुळे संवादाची माध्यमे वेगाने बदलत आहेत. अशा परिस्थितीत मराठीला केवळ पारंपरिक वापरापुरते मर्यादित न ठेवता नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. 'मराठी -ख'च्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर वाढविणे, डिजिटल माध्यमांवर मराठीतील माहिती आणि ज्ञानसामग्री उपलब्ध करून देणे, तसेच ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावर दर्जेदार मराठी कंटेंट मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

बोलीभाषांचा गोडवाही जपला पाहिजे...

प्रमाण मराठीसोबतच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा हा मराठीचा अमूल्य ठेवा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी-अहिराणी, मालवणी, डांगी, झाडीबोली यांसारख्या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकपरंपरा आणि जीवनानुभव सामावलेले आहेत. त्यामुळे या बोलींचे साहित्य, लोकपरंपरा आणि भाषिक वैशिष्ट्ये जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

लंडनमध्ये सुमारे ७० ते ८० हजार मराठी बांधव वास्तव्यास असून, महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून मराठीचे शिक्षण, अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र परीक्षांसारखे उपक्रम राबविले जात आहेत. लंडनमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी केंद्र' उभारण्याच्या दिशेनेही काम सुरू असून, महाराष्ट्र मंडळाची वास्तू खरेदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि जागतिक पातळीवर विस्तार करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. पुण्यातील डेक्कन युनिव्हर्सिटीमध्ये मराठी भाषेसाठी 'उत्कृष्टता केंद्र', लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने 'मराठी वैश्विक केंद्र', राज्यातील विविध बोलीभाषांचे १०० कोश आणि नऊ ठिकाणी 'मराठी कौशल्य विकास केंद्र' उभारण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली.



### अभिजात मराठीच्या संशोधनासोबत डिजिटायझेशनवर भर, तरुणांनी मराठीच्या समृद्ध प्रवासात सक्रिय सहभागी व्हावे - सचिव किरण कुलकर्णी

मराठी भाषेचा प्रवाह केवळ ज्ञानेश्वर महाराज किंवा चक्रधर स्वामी यांच्या काळापासून सुरू झालेला नसून, सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या 'गाथा सप्तशती'पासून तिची समृद्ध परंपरा पुढे आलेली आहे. या प्रदीर्घ भाषिक वारशाचे संशोधन, जतन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत संक्रमण करण्यासाठी मराठी भाषा विभाग कटिबद्ध आहे, असे मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत ग्रंथ भेट देऊन करण्यात आले. यावेळी 'मराठीचे कौतुक भाग-२' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आला.

### पुढील विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आपली माय मराठी ही केवळ महाराष्ट्राची ओळख नाही, तर आपला स्वाभिमान आहे. संत ज्ञानेश्वरांपासून छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंतच्या समृद्ध परंपरेने नटलेली मराठी आता सातासमुद्रापार पोहोचली असून, जगभरात तिचा डंका वाजत आहे. भविष्यातही मराठीचा जागतिक विस्तार अधिक वेगाने व्हावा, यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. डिजिटल जगत, सोशल मीडिया, पॉडकास्ट, गेमिंग आणि कोडिंगसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढवून नव्या पिढीला मराठीशी जोडले पाहिजे. जगातील ५० हून अधिक देशांमध्ये मराठीचा प्रचार आणि प्रसार वाढविण्याचा संकल्प असून, लंडनमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी केंद्र' उभारण्याबरोबरच पुढील विश्व मराठी साहित्य संमेलनही लंडनमध्ये आयोजित केले जाणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

# आदित्य शिक्षण संस्थेत उद्यापासून रंगणार मराठवाडास्तरीय बास्केटबॉलचा थरार!

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयांतील खेळाडूंचा लागणार कस; क्रीडारसिकांचे लक्ष

प्रतिनिधी । बीड

**विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता क्रीडा क्षेत्रात संधी देऊन त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्यासाठी आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयात ५ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठवाडास्तरीय आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या अंतर्गत होणाऱ्या या स्पर्धेत मराठवाड्यातील विविध महाविद्यालयांचे संघ आपले क्रीडाकौशल्य पणाला लावणार आहेत.**

**आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक विकासासोबतच क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन दिले जाते.**

विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच विविध खेळात सहभागी होऊन नेतृत्वगुण व आत्मविश्वास वाढवावा, यासाठी संस्थेच्या वतीने विशेष भर दिला जात आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू इंद्रमणी, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. आर. पी. कदम यांनी या स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी आदित्य कृषी महाविद्यालयाकडे सोपवली आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी डॉ. शृंगारे आणि डॉ. आर. पी. कदम यांच्या नियंत्रणाखाली स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे. सांघिक खेळातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, निर्णयक्षमता, परस्पर सहकार्य आणि संघभावना विकसित होते. मैदानावर एकत्रितपणे काम करताना शिकलेले हे गुण विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक जीवनासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन डॉ. कदम यांनी केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य पुष्पराज राठोड, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल सानप आणि आदित्य जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी सुरू आहे.

खेळाडूंसाठी मैदान व्यवस्था, पिण्याचे पाणी, प्राथमिक वैद्यकीय सुविधा आणि निवास व्यवस्थेचे उत्तम नियोजन करण्यात आले आहे. बास्केटबॉलसारख्या वेगवान खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता व शारीरिक तंदुरुस्ती वाढणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या क्रीडा महोत्सवामुळे बीड शहरात उत्साहाचे व क्रीडामय वातावरण निर्माण झाले आहे.

क्रीडातूनच सशक्त तरुण पिढी घडणार : डॉ. आदित्य सारडा

केवळ पुस्तकी ज्ञानाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास पूर्ण होऊ शकत नाही. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणावमुक्ती, शारीरिक तंदुरुस्ती, निर्णयक्षमता आणि नेतृत्वगुणांची वाढ होते. मैदानावर मिळणारा विजय आणि पराजय दोन्ही पचवण्याची ताकद क्रीडा क्षेत्रातूनच मिळते, जे भविष्यातील आयुष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आदित्य शिक्षण संस्थेत आम्ही विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही उत्तम संधी आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहोत. या आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून मराठवाड्यातील क्रीडापटूंना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ मिळाले आहे. सर्व सहभागी खेळाडूंनी क्रीडाभावनेने आणि शिस्तबद्धतेने खेळून आपले व महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे.

-डॉ. आदित्य सारडा, संचालक, आदित्य शिक्षण संस्था, बीड.

# महसूल मंत्र्यांकडून दुष्काळग्रस्त शेतीची पाहणी

## दुष्काळग्रस्तांना भरीव मदत करणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

अकोला ।प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत हेच शासनाचे प्राधान्य असून, त्यांना भरीव मदतीबरोबरच ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, पशुधनासाठी वैरण व्यवस्था, पेयजल व्यवस्था, जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबविण्यात येतील, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केले.

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत दुष्काळजन्य परिस्थितीबाबत उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागाचा प्रत्यक्ष दौरा पाहणी होत आहे. महसूल मंत्र्यांनी अकोला तालुक्यातील येवता व बाळापूर तालुक्यातील मानकी येथील दुष्काळग्रस्त परिसराची पाहणी केली, तसेच शासकीय विश्रामगृह येथे शेतकरी व नागरिकांकडून निवेदनेही स्वीकारली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या व त्यांना दिलासा दिला. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ड आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर आदी उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, केंद्र शासनाची अधिकाधिक मदत मिळण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे निकष लक्षात घेऊन अचूक पंचनामे होणे गरजेचे असते. त्यामुळे पंचनामे जलदपणे व अचूक पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला त्यांनी दिले. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा-पाणी, पीक पंचनामे आणि शेतीसाठी पाणीपुरवठा यांना प्राधान्य देत प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर व समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

केंद्र शासनाच्या मदतीबरोबरच राज्य शासनाची भरीव मदत व पीक विमा योजना व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच रोजगार निर्मिती व जलसंधारणाची अधिकाधिक कामे राबविण्यात येतील. पेयजल उपलब्धतेच्या दृष्टीने पाण्याचे योग्य नियोजन करण्यात येईल. 'गावातले पाणी गावात, शिवारातले पाणी शिवारात' अशा पद्धतीने पाण्याचा



थेंबनथेंब वाचविण्याचे दृष्टीने ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबवण्यात येतील. दुष्काळामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन व संपूर्ण यंत्रणा भक्कमपणे उभी आहे. जिल्हा नियोजन निधीचा दुष्काळ निवारणासाठी प्रभावी वापर करण्यात येईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. बँकांनी शेतकऱ्यांची व्यथा जाणून संपूर्ण सहकार्य करावे. त्यांना कुठलाही त्रास होता कामा नये. दुष्काळी परिस्थितीत बँकांनी कोणत्याही शेतकऱ्याकडे कर्ज वसुलीसाठी सक्तीचा तगादा लावू नये. अवैध सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक किंवा फसवणूक होत असल्यास, नागरिकांनी न घाबरता यंत्रणेकडे थेट अर्ज करावा, असे त्यांनी सांगितले.

शेतकरी बांधवांच्या पाठीशी संपूर्ण यंत्रणा

शेतकरी बांधवांनी या संकटात हिंमत सोडू नये. संपूर्ण यंत्रणा त्यांच्या पाठीशी आहे. शेतकरी बांधवांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

शेतक-यांशी संवाद व शिदोरी जेवण...

येवता येथील शेतकरी शेख रशीद शेख इस्माईल, तसेच बाळापूर तालुक्यातील हरिश्चंद्र शिरसाठ यांच्या शेतात सोयाबीन पिकाच्या नुकसानाची पाहणी त्यांनी केली. शेख रजू शेख रशीद यांनी शेतात विहीर असतानाही पाण्याची कमतरता, भूजल पातळीतील घट याबाबत माहिती दिली. महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी देगाव शेतकरी बंधा-यावर संजय अवचार यांच्या शेतीमध्ये पाहणी करून शेतकऱ्यांसोबत शिदोरी जेवण त्यांनी घेतले. यावेळी अनेक पदाधिकारी, अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आधार व्यसनमुक्ती केंद्रात महात्मा गांधी जयंती साजरी

बीड( प्रतिनिधी)

येथील आधार मुक्ती केंद्रात काल महात्मा जयंती साजरी करण्यात आली, महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन केल्यांनंतर जयंती निमीत्ताने महात्मा गांधी यांच्या जिवन कार्यावर उपस्थित वक्त्यांनी मनोगत व्यक्त करून त्या औचित्याने दारू आणि इतर अंमली पदार्थांच्या सेवनापासून दुर राहण्याचे आवाहन करण्यात आले, या प्रसंगी आधार व्यसन मुक्ती केंद्राचे सर्वेसर्वा तेजस नाना घुमरे, व्यसन मुक्ती केंद्रातील कर्मचारी श्री संतोष नाटकर, श्री आशोक कदम आणि इतर अनेक मित्र हितचितंक या निमीताने उपस्थित होते.



मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबई येथे 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस'निमित्त 'मराठीचिये कौतुके भाग - २' या पुस्तकाचे प्रकाशन केले. देश-विदेशात मराठी भाषा व संस्कृतीचे जतन करणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या आकाशवाणी वरील मुलाखतींचा या पुस्तकात संग्रह करण्यात आला आहे.यावेळी मंत्री उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. हेमलता बागला व इतर मान्यवर उपस्थित होते.

## गडकिल्ल्यांच्या माहितीपत्रकातून इतिहासाची ज्ञानभ्रमंती, उमापूरच्या विद्यार्थ्यांना अनोख्या उपक्रमातून इतिहासाची गोडी

### सहशिक्षिका शोभा दळवी यांचा आनंददायी शनिवार उपक्रम वाचन, निरीक्षण आणि ज्ञान देवाणघेवाणीतून विद्यार्थ्यांचा इतिहासाशी संवाद

उमापूर ।प्रतिनिधी

पुस्तकातील इतिहास केवळ वाचायचा नाही, तर तो अनुभवायचा आणि मनात रुजवायचा, या उद्देशाने जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उमापूर येथील सहशिक्षिका श्रीमती शोभा दळवी यांनी विद्यार्थ्यांसाठी अनोखा आणि संवेदनशील शैक्षणिक उपक्रम राबविला. 'आनंददायी शनिवार'च्या निमित्ताने विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची माहिती देणारी आकर्षक माहितीपत्रके उपलब्ध करून देत त्यांनी इतिहासाची अनोखी ज्ञानभ्रमंती घडवून आणली.

माहितीपत्रकाच्या एका बाजूला किल्ल्याचे मनमोहक छायाचित्र, तर दुसऱ्या बाजूला त्या किल्ल्याचा इतिहास, वैशिष्ट्ये आणि रंजक माहिती देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने ही माहितीपत्रके हाताळत किल्ल्यांची



माहिती वाचली, चित्रांचे बारकाईने निरीक्षण केले आणि मिळालेली माहिती आपल्या मित्र-मैत्रिणींशी शेअर केली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, ऐतिहासिक वारशाविषयी कुतूहल, निरीक्षणशक्ती आणि संवादकौशल्य विकसित होण्यास मदत झाली. विशेष म्हणजे, पारंपरिक पद्धतीने केवळ पाठांतर करण्याऐवजी विद्यार्थ्यांना कृतीतून आणि आनंदातून इतिहास समजून घेण्याची संधी मिळाली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारे गडकिल्ले विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरला. 'किल्ले पाहिले डोळ्यांनी, इतिहास जाणला मनाने आणि ज्ञानाची सफर झाली आनंदाने!' या भावनेतून झालेली ही ज्ञानभ्रमंती विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरली.नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवणाऱ्या सहशिक्षिका श्रीमती शोभा दळवी यांच्या या अभिनव उपक्रमातून शिक्षण हे केवळ वर्गखोलीपुरते मर्यादित नसून ते अनुभव, जिज्ञासा आणि आनंदातूनही प्रभावीपणे घडू शकते,

## बीड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण प्रभावीपणे राबविण्याचे प्रशासनाचे आवाहन

### शुद्ध व सुरक्षित पाण्यावर भर

बीड (जिमाका)

ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक पाणीपुरवठा स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, सुरक्षितता आणि पाणी गुणवत्तेचे नियमित परीक्षण करून संभाव्य आरोग्य धोके टाळण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, सुरक्षितता व पाणी गुणवत्तेचे नियमित परीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा प्रशासनाच्या वतीने पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण नियमितपणे हाती घेण्यात येते. या सर्वेक्षणातून पाणीपुरवठा स्त्रोत, परिसर तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेतील संभाव्य त्रुटी व जोखीम वेळीच ओळखणे आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे सुलभ होते.

जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले जात असून, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर या सर्वेक्षणाची मुख्य जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सर्वेक्षणामध्ये आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षक यांच्या संयुक्त सहभागातून पाणीपुरवठा स्त्रोतांची कसून पाहणी केली जाते. तसेच ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांचा, विशेषतः महिला सदस्यांचा सक्रिय सहभाग घेण्याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

पाणी स्त्रोतांचे जोखमीनुसार शास्त्रीय वर्गीकरण

स्वच्छता सर्वेक्षणातून प्राप्त गुणांकनाच्या आधारे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे तीव्र जोखीम, मध्यम जोखीम आणि सौम्य किंवा कमी जोखीम अशा तीन प्रमुख वर्गांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. यामध्ये ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक जोखीम असल्यास तीव्र जोखीम, ३१ ते ६९ टक्के जोखीम असल्यास मध्यम जोखीम, तर ० ते ३० टक्के जोखीम असल्यास सौम्य किंवा कमी जोखीम मानली जाते. या मूल्यांकनानुसार संबंधित ग्रामपंचायतींना अनुक्रमे लाल, पिवळे आणि हिरवे कार्ड प्रदान करण्याची यंत्रणा कार्यान्वित आहे.

लाल व पिवळ्या कार्डधारक ग्रामपंचायतींवर विशेष प्रशासकीय लक्ष

पाणी शुद्धीकरण अनियमित असणे, पाणी स्त्रोताचा परिसर अस्वच्छ असणे, पाईपलाईन किंवा टाकीमध्ये गळती असणे, आवश्यक प्रमाणात टी.सी.एल.चा साठा उपलब्ध नसणे तसेच जलजन्य आजारांचा उद्रेक यांसारख्या बाबी आढळल्यास संबंधित ग्रामपंचायतीला उच्च जोखीम म्हणून विचारात घेतले जाते. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर लाल व पिवळे कार्ड प्राप्त ग्रामपंचायतींचा तालुकास्तरावर सखोल आढावा घेऊन आढळलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी तातडीने मार्गदर्शन केले जाते. तीव्र व मध्यम जोखीम असलेल्या पाणी स्त्रोतांबाबत एका महिन्याच्या आत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ग्रामपंचायतींसाठी बंधनकारक करण्यात आले आहे.

ग्राम आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सरपंच, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, जलसुरक्षक व संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्यामार्फत नियमित पाठपुरावा व सनियंत्रण केले जात असून, याद्वारे ग्रामीण भागातील जलजन्य आजारांना प्रभावीपणे आळा बसत आहे.

सलग पाच वर्षे हिरवे कार्ड मिळविणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव

ज्या ग्रामपंचायतीमध्ये सलग पाच वर्षे जलजन्य साथीचा उद्रेक झालेला नाही आणि सलग पाच वर्षे हिरवे कार्ड प्राप्त झाले आहे, अशा आदर्श ग्रामपंचायतींना दोन्ही निकष पूर्ण झाल्यानंतर विशेष चंदेरी कार्ड प्रदान करण्यात येते. अशा ग्रामपंचायतींमधील ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षक यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्याची स्तुत्य तरतूद या अभियानांतर्गत करण्यात आली आहे.

नियमित सर्वेक्षण व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाला प्राधान्य

राज्याच्या धोरणानुसार दरवर्षी पावसाळ्यापूर्वी म्हणजेच १ एप्रिल ते ३० एप्रिल तसेच पावसाळ्यानंतर २ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता सर्वेक्षण मोहीम राबविण्याची प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. जलसुरक्षक, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक व संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना या सर्वेक्षणाचे शास्त्रीय प्रशिक्षण देण्याचे आदेश देण्यात आले आहेत, जेणेकरून सर्वेक्षणाचा दर्जा उंचावेल.

नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

पिण्याचे पाणी हे थेट नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्याने ग्रामपंचायती, आरोग्य विभाग, जलसुरक्षक तसेच सर्वसामान्यांनी पाणी स्त्रोतांच्या स्वच्छतेबाबत सदैव सतर्क राहणे गरजेचे आहे. पाणी स्त्रोताभोवती अस्वच्छता होऊ नये, सांडपाणी साचू नये, पाणीपुरवठा यंत्रणेत गळती राहू नये तसेच पाण्याचे नियमित निर्जंतुकीकरण व आवश्यक तपासणी केली जावी, यासाठी सर्वांनी सामूहिक सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास प. गंडाळ यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने केले आहे. स्वच्छ पाणी - निरोगी समाज या उदात्त ध्येयासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे शासकीय निवेदनात म्हटले आहे.

## जिल्हाधिकारी शेताच्या बांधावर ;पीक पाहणी करुन शेतकऱ्यांशी साधला संवाद



छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.जिल्हाधिकारी गौडा यांनी आज दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी माळीवाडा ता.छत्रपती संभाजीनगर, सराई ता.खुलताबाद, वारेगाव ता.फुलंब्री, चौका ता. छत्रपती संभाजीनगर या परिसराचा पाहणी दौरा केला . पिकांच्या स्थितीचे अवलोकन करुन त्यांनी यावेळी शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तहसीलदार शिवानंद बिडवे तालुका कृषी अधिकारी छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, फुलंब्री व अन्य अधिकारी कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा शेतकऱ्यांशी संवाद साधतांना म्हणाले की, शेतकऱ्यांनी सकारात्मक राहून पंचनामे करण्याकामी शासकीय यंत्रणेला सहकार्य करावे. शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे. कुठल्याही पात्र शेतकऱ्याला लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही. याची खात्री मी स्वतः करणार आहे. पिण्याच्या पाण्याचे साठ्यांमधील अनधिकृत पाणी उपसा बंद करून पिण्याचे पाणी संरक्षित केले जाईल आणि संबंधित यंत्रणेला योग्य ते आदेश दिले जातील असेही जिल्हाधिकारी गौडा यांनी आश्वासित केले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाणी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा छावण्यांची आवश्यकता तसेच रोजगाराच्या उपलब्धतेबाबतही आढावा घेण्यात आला. पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषांनुसार मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.पिकांची सद्यस्थिती, उत्पादनातील संभाव्य घट आणि शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या तातडीच्या उपाययोजनांचे मूल्यांकन करून संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, तसेच पाणी बचत, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी पिकांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे निर्देश देण्यात आले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६

### बीड जिल्ह्यात २२,७२८ शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची माहिती पोर्टलवर अपलोड

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अंतर्गत बीड जिल्ह्यातील अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. ही योजना शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२६ रोजी जाहीर करण्यात आली असून, या योजनेतील काही निकषांमध्ये दिनांक १५/०७/२०२६ नुसार अंशता बदल करण्यात आला आहे. या योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समझोता (जढड) या घटकाच्या अंमलबजावणीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांनी २२,७२८ शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची माहिती महाआयटी मार्फत विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे.

आधार प्रमाणीकरणाच्या सद्यस्थितीनुसार, पात्र ठरलेल्या थकीत शेतकऱ्यांपैकी १४,८८१२ शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी २ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १२,२६८६ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून अद्याप २६,१२६ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण प्रलंबित आहे. ज्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे, त्यांनी त्वरीत जवळील 'आपले सरकार सेवा केंद्रावर' जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे, कारण आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरच लाभ रक्कम थेट कर्जखात्यामध्ये वितरित केली जाईल.

वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या अनुषंगाने, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते दिनांक १/१०/२०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ५४२ कर्जदार शेतकऱ्यांच्या खात्यावर २.९२ कोटी रुपये जमा झाले आहेत. राष्ट्रीयकृत बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ४,३१७० शेतकऱ्यांच्या खात्यावर ४२१.६५ कोटी रुपये जमा झाले आहेत. एकूण बीड जिल्ह्यातील ४,३७१२ शेतकऱ्यांच्या खात्यावर ४२४.५७ कोटी रुपये नवीन जमा झाले आहेत. आतापर्यंत तिन्ही हफ्ते मिळून बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँक व ग्रामीण बँकेच्या १०४६२४ पीक कर्ज थकीत शेतकऱ्यांच्या खात्यावर ८८५.०७ कोटी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पीक कर्ज थकीत ६२५४ शेतकऱ्यांच्या खात्यावर ३३.४९ कोटी रक्कम जमा झालेली आहे. अशा प्रकारे बीड जिल्ह्यातील एकूण ११०८७८ थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर ९१८.५६ कोटी रुपये दिनांक २ ऑक्टोबर २०२६ (तीन हफ्ते मिळून) पर्यंत जमा झाले आहेत.

योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना तातडीने पीक कर्ज वाटप करण्याबाबत सर्व बँकांना शासनामार्फत निर्देश देण्यात आले आहेत. सदर माहिती मा. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड व श्री. सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध करण्यात आली आहे.




मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस'निमित्त 'अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६'चे उदघाटन संपन्न झाले.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. हेमलता बागला व इतर मान्यवर उपस्थित होते.

# मुख्याधिकाऱ्यांचा वाढदिवस की नियमांना बायपास

## दुकान-दुकानांत हार-तुरे फोटोसेशन भोकरदनमध्ये नागरिकांचा सवाल शासकीय पदाची प्रतिष्ठा धुळीस मिळवली का

भोकरदन इसरारखान पठाण :- भोकरदन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गजानन तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सत्कार सोहळ्याने आता वेगळेच वळण घेतले आहे. वाढदिवस होऊन दोन दिवस उलटून गेल्यानंतरही शहरातील विविध खाजगी दुकानांमध्ये जाऊन हार-तुरे स्वीकारणे सत्कार करून घेणे आणि त्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होणे यामुळे नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या या वाढदिवस उत्सवा वर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शासकीय पदावर विराजमान असलेल्या अधिकाऱ्याने अशा प्रकारे सार्वजनिक सत्कार स्वीकारणे नियमांच्या चौकटीत बसते का? असा थेट सवाल आता भोकरदनकरांकडून उपस्थित होत आहे.

हार-तुरे स्वीकारण्याचा सिलसिला सुरूच

मुख्याधिकारी तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी सत्कार करण्यात आल्याचे फोटो समोर आले आहेत. खाजगी दुकानांमध्ये जाऊन हार घालून घेतल्याचे आणि फोटोसेशन केल्याचे चित्र दिसत असल्याने या प्रकाराची चर्चा शहरात रंगली आहे. विशेष म्हणजे नगरपरिषदेच्या कारभाराशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असणाऱ्या व्यक्ती व्यापारी अथवा इतरांकडून सत्कार स्वीकारला जात असेल तर त्याची प्रशासकीय नियमांच्या दृष्टीने तपासणी होणे गरजेचे आहे अशी नागरिकांची भूमिका आहे.

पुस्तक वाटप चांगले मग वाढदिवसाचा उत्सव कशासाठी

मुख्याधिकारी तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी नगराध्यक्ष हर्षकुमार जाधव यांच्या हस्ते एमपीएससी व स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांचा संच लोकमान्य सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष विनायक औटी तसेच संचालक विश्वास जाधव, विजय जैन, साबळे यांच्या स्वाधीन करण्यात आला. यावेळी श्रावणकुमार आक्षे, प्रफुल्लकुमार आक्षे, शमीम भाई, राजेंद्र जाधव, योगेश शर्मा, विलास शिंदे यांच्यासह मित्रमंडळाचे सदस्य उपस्थित होते.स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून देण्याचा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. मात्र या उपक्रमाचे निमित्त करून मुख्याधिकाऱ्यांचा हार घालून सत्कार आणि त्याचे छायाचित्रण का करण्यात आले? असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



वर्तणूक नियमांची चौकट कुठे गेली

शासकीय सेवकांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियमांच्या चौकटीत काम करावे लागते. भेटवस्तू सत्कार पदाची प्रतिष्ठा आणि शासकीय कर्तव्याशी संबंधित आचारसंहितेच्या तरतुदींचे पालन करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या कामकाजाशी संबंधित व्यक्ती किंवा व्यावसायिकांकडून सत्कार भेटवस्तू अथवा अन्य स्वरूपाचे स्वीकार करण्यात आले आहेत का याची वस्तुनिष्ठ चौकशी होण्याची गरज आहे अशी मागणी होत आहे.कार्यालयीन वेळेचा मुद्दाही ऐरणीवर

वाढदिवस हा वैयक्तिक विषय असला तरी शासकीय अधिकारी कार्यालयीन वेळेत अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असल्यास त्याबाबतही प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. सलग दोन-तीन दिवस खाजगी ठिकाणी सत्कार स्वीकारण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यालयीन कर्तव्यापासून वेळ दिला का याचीही चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

प्रसिद्धीचा सोहळा की सामाजिक उपक्रम

पुस्तक वाटपाचा उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे; परंतु त्याला वाढदिवसाच्या सत्काराशी जोडल्याने या उपक्रमाचा मूळ उद्देशच चर्चेच्या भोवऱ्यात आला आहे. सामाजिक उपक्रमाच्या नावाखाली शासकीय अधिकाऱ्याचा वैयक्तिक गौरव करण्याचा प्रयत्न तर झाला नाही ना? असा सवालही उपस्थित होत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करावी या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकारी जालना विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी वस्तुनिष्ठ चौकशी करावी. मुख्याधिकाऱ्यांनी कोणत्या ठिकाणी कोणाकडून आणि कोणत्या स्वरूपाचा सत्कार स्वीकारला त्यावेळी ते कार्यालयीन कर्तव्यावर होते का तसेच संबंधित व्यक्तींचा नगरपरिषदेशी कोणताही व्यावसायिक अथवा प्रशासकीय संबंध आहे का याची तपासणी करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.शासकीय अधिकारी हा कोणत्याही व्यक्तीपेक्षा मोठा नसतो तो नियमांच्या चौकटीत काम करण्यास बांधील असतो. त्यामुळे वाढदिवस या वैयक्तिक कारणाच्या आड नियमांना बगल दिली गेली का याचे उत्तर आता चौकशीमधूनच समोर यायला हवे.दरम्यान या प्रकरणी मुख्याधिकारी गजानन तायडे यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. त्यांची प्रतिक्रिया प्राप्त झाल्यास ती प्रसिद्ध करण्यात येईल.

# सत्य अहिंसा आणि सहिष्णुतेच्या मार्गानेच राष्ट्रीय एकात्मता अबाधित

## अंकुशराव टोपे महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात

जालना ।शेख फारुक :- अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या सत्य अहिंसा व सहिष्णुतेच्या विचारांसह लालबहादूर शास्त्री यांच्या जय जवान जय किसान या ब्रीदवाक्याचे स्मरण करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस म्हणाले की महात्मा गांधी यांनी बलाढ्य ब्रिटिश सत्तेविरुद्ध सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने लढा देत देशाला स्वातंत्र्याच्या दिशेने नेले. गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि सहिष्णुतेच्या विचारांची आजच्या काळातही तितकीच गरज आहे. या मूल्यांमुळेच राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होऊ शकते. लालबहादूर शास्त्री यांचे जय जवान जय किसान हे ब्रीदवाक्य आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या महापुरुषांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजसेवेत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे आणि प्रा. डॉ. श्रीपत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, डॉ. संतोष करवंदे, डॉ. रामनाथ सांगुळे, डॉ. रामदास वैद्य, डॉ. माधव ढेरे, डॉ. शकुंतला म्हस्के, डॉ. शंकर तिकांडे, श्री. सुरेश ठेंग यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बद्रिनाथ शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. विष्णू काळे यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# टपाल सेवेविषयीच्या तक्रारींसाठी १६ ऑक्टोबरला 'डाक अदालत'

बीड (जिमाका)

पोस्टल सेवा ही सामाजिक आर्थिक जीवनाचा अविभाज्य भाग असून, ग्राहकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा पोस्ट विभागाचा प्रयत्न असतो. मात्र सेवेदरम्यान काही त्रुटींमुळे तक्रार करण्याची वेळ येते. अशा तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पोस्ट विभागातर्फे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.पोस्टमास्टर जनरल, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता ही डाक अदालत होणार आहे.छत्रपती संभाजीनगर क्षेत्राशी संबंधित टपाल सेवा, मनी ऑर्डर, बचत बँक खाते, प्रमाणपत्र इत्यादीबाबत ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांमध्ये झालेले नाही व समाधानकारक उत्तर मिळाले नाही, अशा तक्रारींची दखल या अदालतमध्ये घेतली जाईल.

तक्रारदारांनी आपली तक्रार सविस्तर तपशिलासह - उदा. तारीख, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार पाठवली त्यांचे नाव, हुद्दा इ. सह दोन प्रतीत सहायक निदेशक, डाक सेवा (जन शिकायत), श्री. भगवान नागरगोजे, कार्यालय पोस्टमास्टर जनरल, छत्रपती संभाजीनगर - ४३१००२ यांच्या नावे दि. १४ऑक्टोबर २०२६ पर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. प्रपत्र हींïï:/ /.ारहरीरीहींरींीï.र्सेीं.ळप या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# दावरवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी...!



दावरवाडी । प्रतिनिधी

दावरवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती ग्रामपंचायत कार्यालयासमोर मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र वाघमोडे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गांधीजींच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत विस्तार अधिकारी इंगळे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक श्याम तांगडे, गुलाब फाउंडेशनचे चंद्रकांत खांडे, सामाजिक कार्यकर्ते किशोर तांगडे, डी.डी. जाधव, प्रशांत देशमुख, चंद्रशेखर सरोदे, प्रवीण खांडे, नाथा सोरमारे, राजू ननवरे, गोपाल धारे, बाळू रंधे, विजय राऊत, जितू नवगिरे, गणेश सरगर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने मानण्यात आले.

# वडोद तांगड्यात ३०२ जणांचे रक्तदान

## संत निरंकारी मिशनच्या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; ग्रामीण भागातून सामाजिक एकतेचे दर्शन

भोकरदन । इसरार खान पठाण

वडोद तांगडा ता. भोकरदन रक्त नालियों में नहीं नाड़ियों में बहे या संत निरंकारी बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या संदेशाला प्रतिसाद देत संत निरंकारी मिशनच्या वतीने वडोद तांगडा येथे आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ३०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. विविध जाती-धर्मांतील नागरिक, शेतकरी, तरुण, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक एकतेचे दर्शन घडविले.संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या पारध शाखेअंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेच्या परिसरात शुक्रवारी ता. २ सकाळी साडेआठ ते दुपारी चार या वेळेत हे शिबिर झाले. संत निरंकारी मिशनच्या सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आशीर्वादाने आयोजित या उपक्रमाला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला.




शिबिराचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगरचे झोनल इंचार्ज महात्मा सचिनजी आधाने यांच्या हस्ते झाले. संयोजक तथा जालना ज्ञानप्रचारक महात्मा राजकुमारजी परसवानी पारधचे मुखी महात्मा संपतजी काटोले शिवनाचे मुखी महात्मा कैलासजी धोंडेकर, पारधचे संचालक महात्मा बाबुरावजी काकफळे आणि अंबडचे संचालक महात्मा विष्णूजी जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.विशेष म्हणजे महात्मा सचिनजी आधाने यांनी स्वतः रक्तदान करून सेवाभावाचा संदेश दिला. स्वतः पुढाकार घेऊन समाजासाठी योगदान देणे' ही भावना त्यांच्या कृतीतून अधोरेखित झाली.

हा तरुणाईचा उत्सव ग्रामीण भागाचा अभिमान

रक्तदान शिबिराला भोकरदन-जाफराबादचे माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी भेट देऊन रक्तदात्यांशी संवाद साधला. त्यांनी रक्तदात्यांचे मनोबल वाढवून प्रमाणपत्रांचे वाटप केले.वडोद तांगड्यासारख्या छोट्या गावाने आज जे करून दाखविले आहे ते कौतुकास्पद आहे. ३०२ पिशव्या रक्तदान हा केवळ आकडा नसून तरुणाईच्या सेवाभावाचे प्रतीक आहे. शेतकरी आणि ग्रामीण भागातील तरुण सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानासाठी पुढे येतात ही अभिमानाची बाब आहे असे दानवे यांनी सांगितले.

या वेळी रमेश शेठ सपकाळ, डॉ. शालिग्राम सपकाळ, गंगाधर कांबळे आदी उपस्थित होते.

एका रक्तदानातून तीन घटक

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी येथील विभागीय रक्त केंद्राच्या माध्यमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. भारत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ पथकाने रक्तसंकलन केले.

डॉ. भारत सोनवणे यांनी सांगितले शहरांमध्येही काही वेळा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही; मात्र वडोद तांगडा येथे नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एका रक्ताच्या पिशवीपासून लाल रक्तपेशी रक्तद्रव आणि रक्तबिंबिका असे तीन घटक तयार करता येतात. त्यामुळे ३०२ रक्तपिशव्यांपासून विविध रुग्णांना रक्तघटक उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.या पथकात डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. अश्विनी तांगडे, डॉ. प्रमोद सर्वदे, डॉ. ममता राठोड, डॉ. रणजीत राऊत, डॉ. झोरा, समाजसेवा अधीक्षक संतोष कांबळे, कोकिळा आठवले आणि आदित्य सोळंके यांनी सहभाग घेतला.घरोघरी जनजागृती

रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी स्थानिक पातळीवर विशेष प्रयत्न करण्यात आले. पारध येथील श्री. कोलते, वडोद तांगडा येथील रामेश्वर बाबू भवर आणि विठ्ठल साहेबराव तांगडे यांनी घरोघरी जाऊन रक्तदानाबाबत जनजागृती केली.अपघातग्रस्त शस्त्रक्रियेसाठी दाखल रुग्ण प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज असलेल्या माता तसेच विविध आजारांवरील उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी रक्ताची आवश्यकता असते. त्यामुळे नियमित रक्तदानाबाबत जनजागृती करून गरजूंच्या मदतीसाठी नागरिकांनी पुढे यावे असा संदेश या शिबिरातून देण्यात आला.

मानवता, सेवा, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून वडोद तांगडा गावाने ग्रामीण भागातील सामाजिक सहभागाचे उदाहरण निर्माण केले.

# पदापेक्षा माणुसकी मोठी मोठे पद मिळवतानाच मोठे मन जपा

## भास्कर अंबेकर यांचे विद्यार्थ्यांना आवाहन शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव

जालना ।शेख फारुक

माणसाची खरी ओळख त्याच्या पदात प्रतिष्ठेत किंवा बाह्य दिखाव्यात नसते तर ती त्याच्या विचारांत संस्कारांत आणि माणुसकीत असते. विद्यार्थ्यांनी जीवनात मोठे पद मिळविण्याचे स्वप्न जरूर पाहावे मात्र त्या पदासोबत मोठे मन नम्रता संस्कार आणि माणुसकी जपण्याचेही स्वप्न पाहावे असे प्रतिपादन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केले.महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त १०० शिक्षक समूह, जालना यांच्या वतीने आयोजित शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धा-२०२६चा बक्षीस वितरण समारंभ शुक्रवारी दि. २ शांतिनिकेतन विद्यामंदिर येथे पार पडला. यावेळी अंबेकर बोलत होते.

यावेळी अंबेकर यांनी गहिऱ्या नद्यांचे पात्र सावली देणारी झाडे आणि खरे मोती यांचे उदाहरण देत विद्यार्थ्यांना जीवनाचा संदेश दिला. जिल्हाधिकारी,डॉक्टर, लोकप्रतिनिधी किंवा अधिकारी होणे ही निश्चितच मोठी जबाबदारी आहे. मात्र कोणतेही पद माणुसकीपेक्षा मोठे होता कामा नये.पद आज आहे, उद्या नसेल परंतु माणुसकीतून निर्माण झालेली ओळख कायमस्वरूपी राहते असे त्यांनी स्पष्ट केले.

वक्तृत्वातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार

उपशिक्षणाधिकारी रवी जोशी यांनी महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्याचे शासनाचे निर्देश असल्याचे सांगितले. १०० शिक्षक समूहाने या उपक्रमाला विद्यार्थिकेंद्री वक्तृत्व स्पर्धेची जोड देत एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो विचारशक्ती विकसित होते आणि आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता निर्माण होते असे त्यांनी नमूद केले.समूहाचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांनी प्रास्ताविकातून समूहाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वकला आणि आत्मविश्वास निर्माण करणे महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर करणे तसेच त्यांच्या द्विशताब्दी जयंतीचा गौरव करणे हा स्पर्धेमागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.



भविष्यातही विद्यार्थिकेंद्री विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उर्दू विद्यार्थ्यांनाही वक्तृत्वाचे व्यासपीठ

या स्पर्धेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे मराठी भाषेसोबतच उर्दू भाषिक विद्यार्थ्यांसाठीही स्वतंत्र वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. जालना जिल्ह्यात अशा स्वरूपाची स्पर्धा प्रथमच होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

डॉ. प्रदीप हुशे यांनी वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळते, तर अनुजा राऊत यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे सांगितले.स्पर्धेसाठी डॉ. बाबासाहेब खंडाळे, डॉ. चंद्रकांत धोत्रे, नारायण राजेभोसले, भारत साळवे, विलास जमधडे, रामेश्वर धोपटे तसेच उर्दू विभागासाठी नजमोद्दीन सर आणि तालिब कुरेशी यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

रोख रक्कम, सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन गौरव

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम सन्मानचिन्ह प्रमाणपत्र आणि महात्मा फुले यांचे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. बक्षिसांसाठी डॉ. प्रदीप हुशे, गिरीश पुजारी, डॉ. प्रमोद कुमावत, सुभाष भालेराव, अनुजा राऊत, ज्ञानेश्वर पवार, मोहन अंभोरे, राजेश शेवाळे, संदीप इंगोले आणि विजय निकाळजे यांनी सहकार्य केले. प्रमाणपत्र व सन्मानचिन्हासाठी क्रांतिसूर्य महात्मा फुले प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मण घनवट यांनी सहकार्य केले.

दुष्काळसदृश्य परिस्थितीचा विचार करून कार्यक्रम साध्या पद्धतीने पार पडला. मान्यवरांचे स्वागत व सत्कार करताना पुष्पगुच्छांऐवजी महात्मा फुले यांचे पुस्तक भेट देण्यात आले.कार्यक्रमास डॉ. यशवंत सोनुने नायक'चे संपादक संजय देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन साजिद खान पठाण यांनी केले तर अशोक माधवले यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेभाऊ मगर, साजिद पठाण, अशोक माधवले, विलास जमधडे, विजय निकाळजे,रामेश्वर धोपटे, अमोल कंडारे यांच्यासह समूहाच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# गणेशोत्सव गजर भक्तीचा... जागर शांततेचा...!

भक्तीचा उत्साह आणि सामाजिक भान यांचा सुंदर संगम घडला की उत्सवाचे खरे सौंदर्य खुलते.गणेश मिरवणुकांमध्ये कर्णकर्कश डीजेच्या वापराला आवर घालून पारंपरिक वाद्ये आणि लोककलांना दिलेले स्थान हे अशाच संवेदनशीलतेचे उदाहरण आहे.ज्या ठिकाणी गणेश मंडळांनी संयम आणि शिस्तीने मिरवणुका काढल्या,तेथील नागरिकांना मिळालेला दिलासा मोलाचा आहे. शांततेतही उत्सवाचा आनंद भरभरून अनुभवता येतो,हा संदेश या प्रयत्नांतून पुढे आला आहे.

शासन,न्यायव्यवस्था, पोलीस प्रशासन आणि गणेशभक्त यांच्या सामूहिक प्रयत्नांतून घडणाऱ्या या बदलाचे स्वागत करायला हवे. नियमांची अंमल बजावणी करणारे पोलीस कर्मचारी, नियोजन करणारे प्रशासन,सहकार्य करणारी गणेश मंडळे आणि जबाबदारीने सहभागी होणारे नागरिक हे सर्व या परिवर्तनाचे भागीदार आहेत.उत्सवाचे पावित्र्य आणि सार्वजनिक शांतता जपण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट निश्चितच कौतुकास्पद आहेत.



या सकारात्मक प्रयत्नांच्या पार्श्वभूमी वर पुण्यातील काही गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकां मध्ये घडलेले प्रकार मात्र खेदजनक आहेत. ध्वनिप्रदूषणाविरोधात आवाज उठवणारे विद्यानंद बापट यांची खिल्ली उडवणारे देखावे काही मंडळांनी सादर केल्याचे वृत्त समोर आले आहे. एखाद्याच्या भूमिकेशी मतभेद असू शकतात; मात्र त्याला उत्तर देताना वैयक्तिक उपहासाऐवजी संवाद आणि सामाजिक भान जपणे आवश्यक आहे. शांततेची अपेक्षा व्यक्त करणाऱ्या नागरिकांचे म्हणणेही संवेदनशील तेने ऐकले पाहिजे.असे प्रकार टाळून उत्सवाचे पावित्र्य,परस्परांचा सन्मान आणि सार्वजनिक शांतता जपण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

गणेशोत्सव हा समाजाला जोडणारा उत्सव आहे.त्यातील आनंद सर्वांचा असावा आणि सहभागही सर्वांना सुखावणारा असावा.मिरवणुकीत नाचणाऱ्या तरुणांचा उत्साह जितका महत्त्वाचा,तितकीच घरात विश्रांती घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाची शांतताही महत्त्वाची आहे.रुग्णाची झोप, विद्यार्थ्याचा अभ्यास आणि लहान बालकाची विश्रांती यांचा आदर केल्याने उत्सवाला अधिक व्यापक सामाजिक अर्थ प्राप्त होतो.

ध्वनिप्रदूषण दिसत नसले,तरी त्याचे परिणाम दुर्लक्षित करता येत नाहीत. आवाजाची पातळी डेसिबलमध्ये मोजली जाते.आवाजाची तीव्रता,त्याच्या संपर्कात राहण्याचा कालावधी आणि संपर्काची वारंवारता यांवर श्रवणशक्तीला निर्माण होणारा धोका अवलंबून असतो.अति तीव्र आवाजामुळे कानात सतत गुंजन किंवा शिट्टीसारखा आवाज जाणवणे आणि श्रवणशक्तीला कायमस्वरूपी हानी पोहोचणे शक्य असते. त्यामुळे क्षणिक उत्साह आयुष्यभराच्या त्रासाचे कारण ठरू नये,याची काळजी घेणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शांत परिसर ही अभ्यासाची महत्त्वाची गरज आहे.बाहेर सुरू असलेल्या प्रचंड आवाजामुळे वाचन आणि एकाग्रतेत व्यत्यय येऊ शकतो. रुग्ण,वयोवृद्ध आणि लहान बालके यांना आपल्या अडचणी प्रत्येक वेळी व्यक्त करता येतातच असे नाही.त्यांच्या अस्वस्थतेची जाणीव ठेवून आवाजावर संयम राखणे ही माणुसकीची साधी, पण महत्त्वाची कृती आहे.दुसऱ्याच्या शांततेचा आदर करणारी भक्ती समाजाला अधिक जवळ आणते.

मिरवणुकांच्या सुरक्षिततेशीही आवाजाचे नियोजन जोडलेले आहे.ध्वनि वर्धकांच्या प्रचंड आवाजात वाहनांचे इशारे,रुग्णवाहिकेचा सायरन किंवा पोलिसांच्या सूचना ऐकणे कठीण होऊ शकते.गर्दीत संवाद अस्पष्ट झाल्यास नियोजनात अडथळे निर्माण होतात. आवाजावर नियंत्रण ठेवण्याबरोबरच वाहतुकीचे नियोजन, सुरक्षित विद्युतजोडणी आणि आपत्कालीन वाहनांसाठी मोकळा मार्ग ठेवणे आवश्यक आहे.या उपायांचा उद्देश संभाव्य दुर्घटनांचा धोका कमी करणे हाच आहे.

या प्रश्नाची दुसरी बाजू निसर्गाशी संबंधित आहे.आपल्या परिसरातील झाडांवर विसावणारे पक्षी, घरट्यांतील पिल्ले आणि पाळीव प्राणी यांनाही गोंगाटाचा त्रास होऊ शकतो. प्राण्यांच्या जीवनात आवाजाला विशेष महत्त्व असते.संवाद साधणे,अन्न शोधणे आणि धोक्याची चाहूल घेणे यांसाठी ते नैसर्गिक आवाजांवर अवलंबून असतात. मानवनिर्मित गोंगाटा मुळे त्यांच्या संवादात आणि वर्तनात अडथळे निर्माण होऊ शकतात. म्हणून सार्वजनिक शांततेचा विचार करताना माणसां बरोबर पशुपक्ष्यांचेही हित लक्षात घेतले पाहिजे.

पारंपरिक वाद्ये आणि लोककलांना मिळालेली संधी ही सांस्कृतिकदृष्ट्याही महत्त्वाची आहे. लेझीम,ढोल-ताशे, भजन आणि विविध कलापथकांच्या सादरीकरणातून स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळते.नव्या पिढीला आपल्या परंपरांचा परिचय होतो.मात्र,पारंपरिक वाद्ये वाजवितानाही आवाजाची तीव्रता आणि कालावधी यांचे भान आवश्यक आहे. ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न केवळ वाद्याच्या नावाशी संबंधित नाही; तो निर्माण होणाऱ्या आवाजाशी आणि त्याच्या परिणामांशी संबंधित आहे.

डीजेच्या अनियंत्रित वापराला आळा घालण्याचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत.या प्रयत्नांत सातत्य आवश्यक आहे. ध्वनिप्रदूषण किती कमी झाले,याचे स्पष्ट चित्र नियमित ध्वनि मापन आणि अधिकृत नोंदींतून समोर येऊ शकेल.पुढील उत्सवांत गणेश मंडळांनी स्वतःहून आवाजाचे नियोजन करावे. प्रशासनाने जनजागृती आणि अंमलबजावणी यांचा समन्वय साधावा उत्कृष्ट मंडळांचा गौरव करताना सजावटी सोबत शांतता, स्वच्छता,कलाविष्कार आणि सामाजिक जबाबदारी यांनाही महत्त्व द्यावे.

आज या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. सामान्य नागरिक, विद्यार्थी,ज्येष्ठ व्यक्ती आणि लहान बालकांच्या हितासाठी संवेदनशील भूमिका घेणाऱ्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार! स्वतःची व्यथा शब्दांत मांडू न शकणाऱ्या पशुपक्ष्यांच्या हिताचा ही विचार करणारे हे पाऊल मोलाचे आहे. शासन,न्यायव्यवस्था, पोलीस प्रशासन,गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि समंजस गणेश भक्त यांच्या सहकार्याची ही वाटचाल पुढेही सुरू राहावी.गणरायाच्या उत्सवातून आनंदा बरोबर संवेदनशीलता ही वाढू दे.भक्तीचा गजर घुमू दे आणि त्यासोबत निसर्गातील किलबिलही ऐकू येऊ दे!

डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला आवर घालत पारंपरिक कलांना प्रोत्साहन देणारा गणेशोत्सव हा सामाजिक संवेदन शीलतेचा जागर आहे. शासन,न्यायव्यवस्था, पोलीस प्रशासन आणि गणेशभक्तांच्या सहकार्यामुळे शांतता जपण्याच्या प्रयत्नांना बळ मिळते.विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक,रुग्ण, बालके आणि पशु पक्ष्यांच्या हिताचा विचार करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

**डॉ.नागेश कराळे**
९६३७४१३९१३




## विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी जीवाची वाडी येथील अभिषेक चौरेची निवड

### सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव

केज/प्रतिनिधी

बालाघाटच्या डोंगर पट्ट्यातील जीवाची वाडी येथील पैलवान अभिषेक आनंता चौरे याची ५७ किलो वजन गटात विभागीय स्तरा वरील लातूर येथे होणाऱ्या कुस्ती स्पर्धे साठी निवड झाली आहे.तसेच गहिनीनाथ गोरख चौरे याचीही लातूर येथील जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशा बद्दल जीवाचीवाडी ग्रामस्थांच्या वतीने दोन्ही पैलवानांचा भव्य सत्कार करण्यात आला.लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मारकाजवळ आयोजित कार्यक्रमात पैलवानांच्या वडिलांचा शाल,श्रीफळ व फेटा बांधून सन्मान करण्यात आला.या प्रसंगी उपस्थित ह.भ.प.अण्णासाहेब काळे महाराज तसेच चंद्रकांत नरसिंग चौरे, सुभाष सारुक,सुदाम चौरे,चंद्रकांत नामदेव चौरे,बाबासाहेब बांगर, दिगंबर चौरे,सतीश नागरगोजे,आबासाहेब चौरे,बबन पंढरी चौरे, रामधन चौरे, बाळासाहेब चौरे,उप सरपंच सत्यनारायण चौरे या मान्यवरांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## अंबाजोगाई घरफोडीचा पर्दाफाश ! तिसऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या; १८ तोळे सोने अन् ७४३ ग्रॅम चांदी जप्त

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आजपर्यंत ४५ तोळे सोन्याचे दागिने व १६०१ ग्रॅम चांदी पोलिसांच्या हाती अंबाजोगाई शहरातील बंद घर फोडून ५३ तोळे सोन्याचे दागिने, पावणेदोन किलो चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा मोठा मुद्देमाल लंपास करणाऱ्या टोळीतील पाहिजे आरोपीच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी आरोपी मंगलसिंग हिरासिंग बावरी (वय २२, रा. शिवाजी चौक, परळी, जि. बीड) यास परळी रेल्वे पुलाजवळ सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून १८ तोळे (१८७.४३० ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि ७४३ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने (विट) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या कारवाईमुळे अंबाजोगाई घरफोडी प्रकरणात आतापर्यंत ४५ तोळे सोन्याचे दागिने आणि १६०१ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.अंबाजोगाई येथील एक कुटुंब आपल्या राहत्या घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. याच संधीचा फायदा घेत दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी अज्ञात चोरट्याने बंद घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. घरातील ५३ तोळे सोन्याचे दागिने, पावणेदोन किलो चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३९१/२०२६, कलम ३३१ (३), ३३१ (४), ३ (५) बी.एन.एस. अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिसांनी अमर काकासाहेब थोरात (वय २३, रा. क्रांतीनगर, अंबाजोगाई) आणि जगजीतसिंग अचलसिंग दुधानी (वय ३२, रा. शिवाजी चौक, परळी, जि. बीड) यांना अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यातील २७ तोळे (२७० ग्रॅम) सोने आणि ८५८ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात आले होते.

दरम्यान, या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी मंगलसिंग हिरासिंग बावरी हा गुन्हा करून पसार झाला होता. त्याचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. आरोपीचा बाहेर जिल्ह्यात तसेच बाहेर राज्यात शोध घेण्यात आला.

तपासादरम्यान मंगलसिंग बावरी हा बाहेर राज्यातून परळी येथे आपल्या घरी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे दि. ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व



त्यांच्या पथकाने परळी रेल्वे पुलाजवळ गुप्त सापळा रचला. आरोपी मंगलसिंग बावरी तेथे येताच पोलिसांनी शिताफीने त्यास ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता १८ तोळे (१८७.४३० ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि ७४३ ग्रॅम चांदीचे दागिने (विट) असा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या कारवाईमुळे अंबाजोगाई घरफोडी प्रकरणातील चोरीच्या मुद्देमालापैकी आतापर्यंत ४५ तोळे सोन्याचे दागिने आणि १६०१ ग्रॅम चांदीचे दागिने पोलिसांच्या हाती लागले आहेत. उर्वरित मुद्देमालाबाबत तपास सुरू आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही उल्लेखनीय कामगिरी श्री. नवनीत कावत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई; श्री. समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड, तसेच श्री. ऋषिकेश शिंदे, सहायक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड (पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर), झडख सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णु सानप, गोविंद भताने, गोविंद राख, अर्जुन यादव, विकास राठोड, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, अश्वीनकुमार सुरवसे चालक अतुल हराळे यांनी सहभाग घेतला.

## चांगले जीवन जगण्यासाठी रामकथा ऐकणे गरजेचे- संजय महाराज पाचपोर

**शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीराम कथा व भव्य कीर्तन महोत्सवाचा शोभायात्रेने झाला शुभारंभ**

गेवराई (प्रतिनिधी) राम, सूर्य, चंद्र, तारे, आकाश, नदी आणि पाणी जसे नित्य नूतन आहेत, त्याचप्रमाणे प्रभू श्रीरामांची रामकथाही आज नित्य नूतन आहे. रामकथा ही केवळ कथा नसून आपल्या प्रपंचाला योग्य दिशा देणारी जीवनपद्धती आहे. ज्यांनी आपल्या आयुष्याची साठ सत्तर वर्षे जनसेवेसाठी दिली, राज्यकर्त्यांच्या समोर एक आदर्श उभा केला अशा शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेली ही रामकथा पुन्हा पुन्हा ऐकून आपले जीवन सफल होईल असे प्रतिपादन संजय महाराज पाचपोर यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव ( दादा) पंडित वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व भव्य कीर्तन महोत्सवात ते रामकथा सांगताना बोलत होते. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि भाविक भक्त उपस्थित होते.

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९व्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथा ज्ञानयज्ञ आणि कीर्तन महोत्सवाचा शनिवारी दि.३ रोजी सकाळी भव्य शोभायात्रेने उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर शिवनगरी येथे रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांच्या रामकथेस प्रारंभ झाला.



यावेळी कथेच्या प्रारंभी ह.भ.प.कृष्णा महाराज राऊत, गणेश महाराज वारंगे, ह.भ.प तिर्थराज पठाडे, ह.भ.प. हानुमान महाराज, ह.भ.प. नामदेव महाराज , अभिष्टचिंतन सोहळा समितीचे भाऊसाहेब नाटकर यांच्या हस्ते कलश पुजन, प्रतिमा पुजन, ग्रंथपुजन आणि दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आपल्या अमोघ वाणीतून पाचपोर महाराज यांनी रामकथा प्रस्तूत करून उपस्थित भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले.

रामकथा सांगत असताना

संजय महाराज पाचपोर म्हणाले की, जसा जीवन जगण्यासाठी प्राणवायू आवश्यक आहे, त्याचप्रमाणे चांगले आणि संस्कारक्षम जीवन जगण्यासाठी रामकथा आवश्यक आहे. विश्वाला जीवन देण्याचे काम अन्न करते. जीवन जगण्यासाठी अन्न जितके गरजेचे आहे, तितकीच जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी रामकथा गरजेची आहे. ज्याला केवळ जीवन जगायचे आहे त्याला अन्नाची गरज असते; मात्र ज्याला चांगले, आदर्श आणि संस्कारपूर्ण जीवन जगायचे आहे, त्याने रामकथा ऐकली पाहिजे. रामकथा माणसाला कर्तव्य, संस्कार, संयम आणि सदाचाराची दिशा देणारी असल्याने तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. रामकथा ही व्यासपीठावरील कथा नाही तर ती प्रत्येक घरातील कथा आहे असेही संजय महाराज पाचपोर यांनी सांगितले. यावेळी त्यांना संगीत साथ गायक अच्युत पाटील, विवेक गावंडे, बासरीवादक राम पाटील आणि तबलावादक अक्षय मोरे यांनी दिली. कथेची सांगता प्रभू रामचंद्राच्या आरतीने करण्यात आली. यावेळी रिल्सस्टार आणि असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आरती संपन्न झाली.

## श्री खोलेश्वर विद्यालयात अभिजात मराठी भाषा दिन उत्साहात

अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठी स्वाक्षरी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

दि. ३ ऑक्टोबर रोजी अंबाजोगाई येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अभिजात मराठी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यालयात 'मराठी स्वाक्षरी' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मराठीत स्वाक्षरी करून मराठी भाषेचा जागर केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक संदीप देशमुख तसेच मराठी विषयाच्या ज्येष्ठ शिक्षिका व प्रमुख मार्गदर्शक कुसुमावती बडेराव उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक नागेश देशपांडे यांनी केले. त्यांनी अभिजात मराठी भाषा दिनाचे महत्त्व व मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेविषयी माहिती दिली. स्वप्ना सेलुकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून पाहुण्यांचा परिचय करून दिला.



प्रमुख मार्गदर्शक कुसुमावती बडेराव यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा समृद्ध इतिहास, साहित्यिक परंपरा, सांस्कृतिक वारसा तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यामागील प्रवास याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून तिचे जतन व संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.यानंतर मराठी विषय शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.अमृत महोत्सवी वर्ष व अभिजात मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या 'मराठी स्वाक्षरी' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठी भाषेचा अभिमान जपत दैनंदिन जीवनात मराठीचा अधिकाधिक वापर करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात बाहुलीची पूजा!

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

दि ३ ऑक्टोबर भाद्रपद अष्टमी म्हणजे जयंती दिन रोजी श्री सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात समाधी बचाव चे कार्यकर्ते लाईट चे काम करण्यासाठी गेले त्यानी नवीन लाईट्स बसवलतअसता त्यांना हा प्रकार पहिला. जी अत्यंत निंदनीय असा आहे. समाधी परिसरात बाहुली ची पूजा करून नैवद्य ठेवलेला दिसतो आहे. विशेष म्हणजे बाहुलीचा माने पासून वरचा भाग गायब आहे. समाधी बचाव कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस स्टेशन, नगरपालिका यांच्याकडे या पूर्वीच निवेदन देऊन येथे होणाऱ्या गैरप्रकार बद्दल माहिती दिली आहे.सी सी टिव्ही बसवावेत अशीही मागणी केलेली आहे शिवाय गैरप्रकार विषयी माहिती वेळोवेळी दिली आहे,आत्ताही दिली जात आहे. आता तरी प्रशासकीय पातळीवर काही उपाय योजना होणार आहेत का? हा प्रश्न वरचेवर गंभीर होताना दिसतो आहे.



## शिरूरकरांची नात बनली डोंगरकिन्ही ग्रामपंचायतची उपसरपंच !

## अवघ्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी बनली गांव कारभारी !

पांच विरोधात सहा मतदानाने झाली विजयी !

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील रहिवाशी असलेल्या बबनराव गाडेकर यांच्या मुलीची मुलगी म्हणजे शिरूरकरांची नात वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी ग्रामपंचायतची उपसरपंच म्हणून गावकारभारी बनली असुन सदस्य मतदानात अकरापैकी सहा सदस्यानी तीला मतदान केले .

डोंगरकिन्ही येथील व्यापारी संतोष कोळपकर यांची इंटिरिअर डिझायनर असे उच्चशिक्षीत मुलगी आदिती कोळपकर ग्रामपंचायत निवडणुकीत सदस्य म्हणून निवडून आली होती ,नुकतीच उपसरपंच पदासाठी तीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता यात तीला अकरा पैकी सहा सदस्यानी मतदान केले असुन तीला उपसरपंच म्हणून विजयी घोषीत करण्यात आले .

विवाहापुर्वीच तीने गावच्या राजकारणात उडी घेतली त्यात तीला मतदारांनी कौल दिला पुढे आता उपसरपंच म्हणून संधी मिळाली असल्याने माहेरच्या विकासाबाबत तिच्या उच्यशिक्षीत पणाचा होणार असुन आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला आपण तडा जाऊ देणार नसल्याचे नवनियुक्त उपसरपंच आदिती कोळपकरने सांगितले .

नेतृत्वावर विश्वासाचे फळ !

आष्टी पाटोदा शिरूरचे आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन एकनिष्ठ राहिल्याचे फळ म्हणून आपली उपसरपंच पदावर निवड केली असल्याचे आदिती ने सांगितले.

आजोळातून नातीचे कौतुक !

उपसरपंचपद मिळाल्याने आजोळातून आदिती चे मामा नागेश गाडेकर , माजी नगराध्यक्ष रोहिदास पाटील , माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील , गटनेते गणेश भांडेकर आदिकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे .



# वडवणी शहरात प्रथमच सामाजिक संस्थेचा स्वच्छता अभियानात पुढाकार मुख्याधिकारी पोपट निगळ यांच्याकडून संस्थेचे कौतुक



वडवणी ।प्रतिनिधी

स्वच्छता ही सेवा हा संदेश केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्यक्ष कृतीत उतरवत आदर्श फाउंडेशन, वडवणी आणि वडवणी नगरपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांना सामाजिक संस्थेने दिलेली ही साथ विशेष ठरली. स्वच्छता अभियानात सामाजिक संस्थेने सक्रिय सहभाग घेऊन प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम राबविल्याबद्दल नगराध्यक्ष शेषेराव जगताप व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट निगळ यांनी आदर्श फाउंडेशनचे कौतुक केले.वडवणी शहरातील स्वच्छता ही केवळ नगरपंचायतीची जबाबदारी नसून त्यामध्ये नागरिक आणि सामाजिक संस्थांचाही तितकाच सहभाग आवश्यक आहे. याच भावनेतून आदर्श फाउंडेशनने पुढाकार घेत नगरपंचायतीच्या सहकार्याने स्वच्छता अभियान राबविले. या उपक्रमातून सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यासोबतच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

अस्वच्छ ते मुळे निर्माण होणाऱ्या समस्या, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, ओला व सुका कचरा वेगळा करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर टाळणे तसेच परिसर स्वच्छ ठेवणे याबाबत नागरिकांना संदेश देण्यात आला. 'माझा परिसर, स्वच्छ माझी 'जबाबदारी' या भावनेतून प्रत्येकाने स्वच्छतेची सुरुवात स्वत:पासून करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी नगरपंचायत प्रशासनाकडून शहराच्या स्वच्छतेसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असताना सामाजिक संस्थांचा सहभाग मिळाल्यास या मोहिमेला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त होऊ शकते. प्रशासन आणि सामाजिक संस्था एकत्र आल्यास स्वच्छतेचा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे अधिक प्रभावी ठरते, असेही यावेळी मत व्यक्त करण्यात आले. स्वच्छता अभियानातून केवळ परिसर स्वच्छ करण्याचा संदेश न देता पर्यावरण संवर्धनाचाही जागर करण्यात आला. प्लास्टिकचा वापर कमी करणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, झाडे लावणे व त्यांचे संवर्धन करणे, तसेच शहर अधिक हिरवेगार करण्यासाठी नागरिकांनी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. आदर्श फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे स्वच्छता ही प्रशासनाचीच नव्हे तर समाजाची सामूहिक जबा

संस्थेने आदर्श निर्माण केला

नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी आदर्श फाउंडेशनच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, वडवणीच्या इतिहासात प्रथमच एखाद्या सामाजिक संस्थेने स्वच्छता अभियानात सहभागी होऊन प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम राबविली आहे. आदर्श फाउंडेशनने पुढाकार घेऊन एक आदर्श निर्माण केला आहे. शहराच्या स्वच्छतेसाठी सामाजिक संस्थांनी पुढे

ही कौतुकास्पद बाब आहे. भविष्यात येणाऱ्या अल-निनो प्रभावामुळे शहरात नागरिकांना पाणीटंचाई भेडसावू शकते त्यामध्ये नागरिकांत जनजागृती आदर्श फाउंडेशनने पाणी व्यवस्थापनामध्येही जनजागृती करावी आणि समाजासमोर एक आदर्श निर्माण करावा.

## सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक कै. सौ. मालनबाई सावताराम राऊत यांचे दुःखद निधन



गेवराई ।प्रतिनिधी

कानडी माळी, ता. केज, जि. बीड : येथील सेवा सहकारी सोसायटी लि.च्या संचालक कै. सौ. मालनबाई सावताराम राऊत (वय ६५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे राऊत कुटुंबीयांसह नातेवाईक, मित्रपरिवार व परिसरात शोककळा पसरली आहे.कै. सौ. मालनबाई राऊत यांनी सेवा सहकारी सोसायटीच्या संचालकपदाची जबाबदारी पार पाडताना संस्थेच्या कामकाजात योगदान दिले. सामाजिक व कौटुंबिक जीवनातही त्यांचा प्रेमळ व आधार देणारा स्वभाव परिचित होता.त्यांच्या पश्चात कन्या उमाताई महेंद्र दुधाळे (पुणे), मुलगा श्री. बलभीम सावताराम राऊत, ब्रँच मॅनेजर, बँक ऑफ बडोदा तसेच मुलगा श्री. अर्जुन सावताराम राऊत, सरकारी सेवेत कार्यरत, असा परिवार आहे.कै. सौ. मालनबाई राऊत यांच्या निधनाने कुटुंबीयांनी आपली प्रेमळ व आधार देणारी व्यक्ती गमावली आहे. त्यांच्या सामाजिक व कौटुंबिक योगदानाच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाबद्दल परिसरातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध स्तरांतून भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त करण्यात येत आहे.दैनिक समर्थ राजयोग परिवार राऊत कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहे.

## स्वयंपूर्ण खेडी हा महात्मा गांधींचा विचार कृतीत आला पाहिजे – डॉ.हनुमंत सौदागर




केज/प्रतिनिधी

स्वयंपूर्ण खेडी हीच महात्मा गांधींना खरी आदरांजली ठरेल त्यांचा विचार कृतीत आला पाहिजे असे प्रतिपादन डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले.ते सरस्वती महाविद्यालय केज येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य डॉ. किरणकुमार धिंमधिमे हे होते.महात्मा गांधींच्या स्वप्नातील ग्रामविकासासाठी स्वदेशी आणि स्वावलंबन याविचारांचे महत्त्व अधोरेखित करत डॉ.हनुमंत सौदागर यांनी स्वयंपूर्ण खेड्यांच्या निर्मितीची गरज व्यक्त केली. गांधीजींच्या विचारांची प्रत्यक्ष आचरणातून जपणूक करणे हीच त्यांना अर्थपूर्ण आदरांजली ठरेल,असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात उप प्राचार्य डॉ. किरणकुमार धिंमधिमे यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महात्मा गांधींच्या योगदानाचा आढावा घेतला. असहकार आंदोलन, दांडी यात्रा आणि सविनय कायदेभंग चळवळ यांवर त्यांनी प्रकाश टाकला.तसेच स्वदेशी,स्वावलंबन, सत्य आणि अहिंसा या गांधीजींच्या विचारांचे महत्त्व विषद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.नागेश कराळे यांनी केले,तर डॉ.सारिका बुरगे यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात गांधी - शास्त्री जयंती व मराठी भाषा अभिजात दर्जा दिन विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने संपन्न



केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड च्या वतीने दिनांक २ आक्टोंबर २०२६ रोजी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रणेते मोहनदास करमचंद गांधी व स्वतंत्र भारताचे पंतप्रधान व थोर स्वातंत्र्यसेनानी लालबहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती व्याख्यान व परिसंवाद कार्यक्रम घेवून साजरी करण्यात आली.सर्व प्रथम गांधीजी व शास्त्रीजी यांच्या प्रतिमेला रामराव तात्या गायकवाड व ज्योतीराम घोगले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.प्रमुख व्याख्याते म्हणून दादासाहेब गायकवाड,शिवदास गायकवाड,रामराजे गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली.त्यानंतर परिसंवाद घेण्यात आला.या परिसंवादात बापूराव राऊत,संजय सोनवणे,बापुराव गायकवाड,गोरक्ष पुरी, संभाजी लवटे,येडबा वैरागे,नारायणभाऊ गायकवाड,वामन गायकवाड,रंजीत गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड यांनी सहभागी होवून मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. आपल्या अध्यक्षीय समारोपात महात्मा गांधी हे वन मॅन आर्मी तर लालबहादूर शास्त्री जय जवान,जय किसान चा नारा देवून शेतकऱ्यांचा आणि भारतीय जवानांचा सन्मान करणारे पंतप्रधान व महान स्वातंत्र्यसेनानी ही होते असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.दिनांक ३ आक्टोंबर २०२६ रोजी मराठी भाषा अभिजात दर्जा दिन ग्रंथप्रदर्शन व चर्चासत्र घेवून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून एस.के.वैरागे,रामराजे गायकवाड,प्रकाश गायकवाड,संजय सोनवणे यांची उपस्थिती होती.ग्रंथप्रदर्शनाला विद्यार्थी,जेष्ठ नागरिक, वाचक यांची उपस्थिती होती.तर चर्चासत्रात एस.के.वैरागे,रामराजे गायकवाड,संजय सोनवणे,प्रकाश गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड यांनी सहभाग घेवून मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. केंद्र सरकारने ३ आक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याचे सांगून यामुळे मराठी भाषेला,मराठी साहित्याला समृद्ध करण्यासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात निधी देण्यास बांधिल झालेले आहे. यामुळे मराठी भाषा व मराठी साहित्य समृद्ध होईल असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.माझ्या मराठीचे बोलु कौतुके अमृतातेही पैजा जिंके ऐसे अक्षरे रसिके मेळविण असे गौरोद्गारही डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी काढले.मराठी भाषेला व मराठी साहित्याला राष्ट्रीय पातळीवर मान सन्मान मिळाला आहे म्हणून हा मराठी भाषा अभिजात दर्जा दिन साजरा करत आहोत असे प्रतिपादनही डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाचेप्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शनही ग्रंथालयाचे व्यवस्थापकीय व प्रशासकीय प्रमुख आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

## छबाबाई काळे यांचे निधन



गेवराई : शहरातील संजय नगर भागातील रहिवासी छबाबाई विनायकराव काळे वय ९५ यांचे अल्पशा आजाराने शनिवारी रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले. त्यांच्यावर शनिवार रोजी दुपारी २ वाजता शहरातील चिंतेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुलं,सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. येथील शिवाजी काळे, नगरपरिषदे सेवानिवृत्त कर्मचारी राधाकिसन काळे, प्रल्हाद काळे यांच्या त्या आई होत्या.

# मराठवाडा पदवीधर निवडणुकीच्या रणांगणात अंकुशराव शिंदे!



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा राज्य पोलीस दलातील अग्रगण्य नाव म्हणून ओळख निर्माण केलेले सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे हे छत्रपती संभाजीनगर-मराठवाडा पदवीधर विधान परिषद निवडणुकीच्या रणांगणात उतरणार असल्याची माहिती समोर आली आहे. सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील आयुक्तालय कार्यालयात ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. त्यांच्या उमेदवारीमुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील निवडणुकीच्या राजकीय वातावरणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.मराठवाड्यातील पदवीधर तरुणांच्या विविध प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना पदवीधरांमध्ये निर्माण झाली आहे. सत्ताधारी असो अथवा विरोधक, पदवीधरांच्या अपेक्षांना अपेक्षित न्याय मिळाला नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या तीन टर्मपासून विद्यमान आमदारांकडून पदवीधरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही केला जात आहे. सत्तेत असतानाही उपेक्षा आणि सत्ता नसतानाही उपेक्षा, अशीच भूमिका आतापर्यंत राहिल्याची भावना अनेक पदवीधरांमध्ये असल्याचे बोलले जात आहे.

पदवीधर तरुणांचा नवा चेहरा देण्याचा आग्रह

आत्तापर्यंत ज्या लोकांवर पदवीधरांनी विश्वास दाखविला, त्यांच्याकडूनच अपेक्षाभंग झाल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे यावेळी प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तीने पदवीधरांच्या प्रश्नांसाठी पुढे यावे, अशी अपेक्षा मराठवाड्यातील पदवीधर तरुणांकडून व्यक्त होत आहे.याच पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील होळ गावचे रहिवासी आणि बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अंकुशराव शिंदे यांनी ही निवडणूक लढवावी, असा आग्रह मराठवाड्यातील पदवीधर तरुणांकडून केला जात असल्याचे सांगितले जात आहे.

पोलीस दलातील उत्कृष्ट सेवेचा अनुभव

अंकुशराव शिंदे यांनी राज्य पोलीस दलात दीर्घकाळ सेवा बजावताना विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांच्या कार्याची पोलीस दलात वाखाणणी झाली असून, त्यांच्या सेवेला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी गौरविण्यात आल्याचे सांगितले जाते. पोलीस दलाच्या माध्यमातूनही त्यांच्या कार्याचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे.कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवताना सामान्य नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणे, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहणे, ही त्यांच्या सेवाकाळातील वैशिष्ट्ये राहिली असल्याची भावना त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. निष्कलंक आणि उत्कृष्ट सेवेसाठी ओळख असलेले अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

## शेलगाव गांजी येथील वळणावर दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील केज - कळंब महामार्गांवरील गांजी फाट्यावर गुरूवार दि. १ आक्टोबर रोजी रात्री साडे आठ वाजण्याच्या दरम्यान उत्तरेश्वर महादेव उबाळे वय ४० वर्षे हे आपल्या दुचाकी क्र.एम एच १४/ डी डी ८३९० वरून केज येथून साळेगाव, शेलगाव गांजी मार्गे युसुफवडगावकडे जात होते.दरम्यान,शेलगाव गांजी रस्त्याकडे वळण्याच्या वळणावर त्यांची दुचाकी अचानक घसरून झालेल्या अपघातात ते रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात फेकले गेले आणि डोक्याला गंभीर मार लागून,मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.




अपघात झालेले ठिकाण आडवळणाचे आणि निर्मनुष्य असल्याने,व रात्रीच्या वेळी अंधार असल्याने हा प्रकार सकाळ पर्यंत कोणाच्याही लक्षात आला नाही.त्यामुळे त्यांचा मृतदेह रात्रभर तेथेच निर्जन स्थळी अंधारात पडून होता. दुसऱ्यादिवशी शुक्रवार दि.२ आक्टोबर रोजी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास शेतात जाणाऱ्या नागरिकांना मृतदेह दिसल्यानंतर त्यांनी तातडीने केज पोलिसांना ही माहिती दिली.माहिती मिळताच पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या आदेशाने जमादार महावीर सोनवणे व बाबजी दराडे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदना साठी उपजिल्हा रुग्णालयात हलविला. या प्रकरणी केज पोलिसात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास जमादार महावीर सोनवणे ह करीत आहेत.

# माऊली दुर्गा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अभिजीत सोनवणे

### १९ वर्षांची अखंड परंपरा; सांस्कृतिक कार्यक्रमांसह भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील संजयनगर येथील माऊली ग्रुपच्या वतीने गेल्या १९ वर्षांपासून सुरू असलेल्या माऊली दुर्गा उत्सव समितीची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्षपदी अभिजीत सोनवणे यांची निवड करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी पप्पू बांडे, सचिवपदी राजेंद्र काजळे, सहसचिवपदी रामेश्वर मोटे, कार्याध्यक्षपदी विशाल शेलार, कोषाध्यक्षपदी सुनील शेलार आणि सल्लागारपदी अमोल कडवंचे यांची निवड करण्यात आली आहे. माऊली ग्रुपच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

माऊली ग्रुपच्या माध्यमातून गेल्या १९ वर्षांपासून धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची परंपरा अखंडपणे जपली जात आहे. यंदाही नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येणार आहे. यामध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसह स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत गरजू रुग्णांना मदत व्हावी आणि रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे माऊली ग्रुपच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. गेल्या १९ वर्षांपासून सुरू असलेली धार्मिक व सामाजिक परंपरा यापुढेही एकजुटीने अधिक उत्साहात पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नागरिक आणि युवकांच्या सहभागातून यंदाचा दुर्गा उत्सव भक्तिमय व सामाजिक उपक्रमांनी परिपूर्ण करण्याचा मानस समितीने व्यक्त केला आहे.



## चालत चालणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दागिने दुचाकीवरून आलेल्याने चोरले




केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील भोपला येथील प्राथमिक शाळेतून आपल्या मुलीला घरी रस्त्याने पायी चालत घेवून जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मणी, मंगळसूत्र दुचाकी वरून आलेल्या दोघां पैकी एकाने हिसका देऊन तोडून चोरून नेल्याची घटना बुधवार दि.३० सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान केज तालुक्यातील भोपला गावा जवळील पुलावर घडली आहे.

बुधवार दि.३० सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान आपल्या शाळेतील लहान मुलीसह भोपला गावातील ओढ्याच्या पुलावरून घरी जाणाऱ्या महिलेला दोन दुचाकीवरून आलेल्या तिघांनी पहिले.व दुचाकी त्या महिलेजवळ थांबवली असता एकाने दुचाकी वरून खाली उतरून महिलेला ढकलून दिले. व महिला जमिनीवर कोसळली असता तिच्या गळ्यातील ५ ग्राम सोन्याचे मणी, मंगळसूत्र व ४० सोन्याचे मणी असलेले ७५ हजार रुपयाचे मिनी गंठण चोरून घेवून ते कळंब च्या दिशेने गेले.या प्रकरणी सविता विष्णू तुवर वय २५ वर्षे रा.भोपला या महिलेच्या फिर्यादी वरून दुचाकी वरून आलेल्या तीन अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला असून पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे ह पुढील तपास करीत आहेत.

# केळी उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई द्या

## पंचनामे करून एनडीआरएफच्या निकषानुसार मदत द्यावी आ. श्रीजया चव्हाण यांच्याकडे मागणी

अर्धापूर (प्रतिनिधी): नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या केळी बागांचे महसूल विभागाने तातडीने पंचनामे करून एनडीआरएफच्या निकषानुसार दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी.अशी मागणी आ.श्रीजया चव्हाण यांच्याकडे दि.२ शुक्रवारी रोजी करण्यात आली.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने उभ्या केलेल्या केळी बागांना प्रतिकूल हवामानाचा मोठा फटका बसला आहे. ऐन उत्पादनाच्या काळात झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, नुकसानग्रस्त केळी बागांचे पंचनामे करून शासनाकडून मदत मिळवून देणे गरजेचे आहे.

शासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई मिळाल्यास संकटात सापडलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळेल अशी मागणी आमदार श्रीजया चव्हाण यांच्याकडे केली आहे.



यावेळी नगराध्यक्षा सौ.वैशाली प्रवीण देशमुख, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे,नगरसेवक राजेश्वर देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,शेतकरी प्रल्हादराव माटे, संचालक व्यंकटराव साखरे,माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे,शहराध्यक्ष योगेश हळदे,सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब,तुकाराम माटे, विनोद पांडे,बाबुराव जाधव, शिवशंकर वाघमारे,ज्ञानेश्वर माटे यांच्या सह केळी उत्पादक शेतकऱ्यांची हि मागणी शासन स्तरावर पाठपुरावा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी निवेदनाद्वारे केली आहे.

आ.श्रीजय चव्हाण यांनी शहरातील विविध भागात महात्मा गांधी जयंती निमित्त अर्धापूर शहरातील केशवराज मंदिरात साफसफाई करून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी शहरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणे तून वसुंधरा पायी दिंडीचे केज नगरीत भव्य स्वागत

केज/प्रतिनिधी

जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने वसुंधरा पायी दिंडी पर्यावरण संवर्धन स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश घेऊन दि.२८ सप्टेंबर सोमवार रोजी निघून पाचशे किलोमीटरचा प्रवास करत महाराष्ट्रा च्या कानाकोपऱ्यातून ग्लोबिन वॉर्मिंगचा संदेश देत दिनांक २१ आक्टोबर २०२६ रोजी नाणिजधाम येथे पोहोचत असून जागोजागी झाडे लावा पर्यावरण वाचवा हा संदेश देत आहे.जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्राच्या मुख्य रस्त्यावर ५३ रुग्णवाहिका चालतात तसेच आत्तापर्यंत २५३ देहदान झालेले असून १४८ अवयव दान झालेले आहेत तसेच ब्लड नीड या माध्यमा तून पंधरा दिवसात १ लाख ४८ हजार बाटल्या संकलित केलेले आहेत आणि पंधरा दिवसांमध्ये जागतिक ६१८००० झाडे लावण्याचा रेकॉर्ड केलेला आहे अशा या वसुंधरा पायी दिंडीचे केज नगरीमध्ये भव्य स्वागत करण्यात आले यावेळी अंबाजोगाई नगर परिषदचे नगराध्यक्ष श्री.नंदकिशोर मुंदडा तसेच केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड उपस्थित होत्या.

## पावसाअभावी केज तालुक्यातील पिराची वाडी येथे सोयाबीनचे पीक करपले; शेतकरी संकटात!



केज/प्रतिनिधी

यावर्षी तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्यामुळे पिराची वाडी आणि परिसरातील डोंगराळ भागातील हलक्या जमिनीवरील सोयाबीन चे पीक पूर्णपणे करपून गेले आहे. हातचे पीक गेल्यामुळे येथील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

डोंगराळ भाग आणि हलकी जमीन ठरली घातक

केज तालुक्यातील पिराची वाडी हा परिसर डोंगराळ भागात येतो.येथील जमिनी प्रामुख्याने हलक्या आणि मुरमाड स्वरूपाच्या आहेत. अशा जमिनींमध्ये पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता खूप कमी असते.यंदा पावसाने ऐन गरजेच्या वेळीच दगा दिला. लागोपाठच्या कडक उन्हामुळे आणि पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे जमिनीतील ओलावा संपला आणि उभे सोयाबीनचे पीक डोळ्यांदेखत जळून खाक झाले.

लागवडीचा खर्चही निघणे कठीण

शेतकऱ्यांनी महागडे बियाणे,खते आणि मशागतीसाठी हजारो रुपये खर्च केले होते. सोयाबीन जोमदार येईल आणि चांगला उतारा मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना होती.मात्र, पावसा अभावी पिके करपल्याने आता काढणीचा खर्च निघणेही कठीण झाले आहे.पिकांचे रूपांतर वाळलेल्या चाऱ्यात झाल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

## डॉग स्कॉडच्या पोलीस वाहनाचा भीषण अपघात

## दोन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी; श्वान 'शेरू' किरकोळ जखमी

मृत्यूच्या दाढेतून पोलिसांचा बचाव; नांदेडला उपचारासाठी हलविले

तामसा : (प्रतिनिधी)

चोरीच्या घटनेच्या तपासासाठी नांदेडहून तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कांडली येथे येत असलेल्या डॉग स्कॉडच्या पोलीस वाहनाला शुक्रवारी (दि. २ ऑक्टोबर) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. पिंपराळा येथील नटराज जिनिंग अँड प्रेसिंग कारखान्याजवळील वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पोलीस वाहन रस्त्याच्या विरुद्ध दिशेला जाऊन सुमारे चार फूट खोल खड्ड्यात कोसळले. या दुर्घटनेत दोन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले, तर श्वानपथकातील 'शेरू' हा श्वानही किरकोळ जखमी झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, कांडली येथे चोरीची घटना घडल्याने तपासासाठी नांदेड येथून डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले होते. श्वानपथक घेऊन पोलीस वाहन कांडलीकडे जात असताना पिंपराळा परिसरातील धोकादायक वळणावर अचानक



चालकाचे नियंत्रण सुटले. वाहन रस्त्याच्या खाली जाऊन खोल खड्ड्यात कोसळल्याने वाहनाचे मोठे नुकसान झाले.जखमी पोलिसांना तातडीने रुग्णालयात हलविले

अपघाताची माहिती मिळताच तामसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर, पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप पाईकराव, वाहनचालक किरण डोरले, पोलीस कॉन्स्टेबल कुणाल लोखंडे व करण वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते संजय सोमेवाड, सुनील बोईनवाड, अमोल कंठाले, सचिन पवार यांनी जखमी यांना गाडीतून बाहेर काढून मदतकार्य केले. अपघातग्रस्त वाहनातून जखमी कर्मचाऱ्यांना बाहेर काढून तातडीने तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.

या अपघातात पोलीस वाहनचालक रमेश शिवाजी नागरगोजे (बक्कल क्र. २९९३) आणि श्वानतज्ज्ञ माधव देवाजी पल्लेवाड (बक्कल क्र. ३१६८) हे गंभीर जखमी झाले. वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी सूर्यवंशी यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी दोघांनाही नांदेड येथील विष्णुपुरी रुग्णालयात हलविण्यात आले.

'शेरू'ची प्रकृती सुरक्षित

दरम्यान, या अपघातात डॉग स्कॉडमधील 'शेरू' हा श्वानही किरकोळ जखमी झाला. अपघातानंतर त्याला तामसा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश कबले व पोलीस कॉन्स्टेबल मुदशीर खान यांनी त्याची देखरेख करत त्याला अन्न-पाणी दिले. सध्या 'शेरू'ची प्रकृती सुरक्षित असल्याची माहिती आहे. तामसा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत कांडली येथे दिनांक एक ऑक्टोबर रोजी रात्री साईनाथ बहिरवाड यांच्या राहता घरी रात्री अकरा ते पाच दरम्यान अग्यात चोराने घरात घुसून घरातील कपाटात चे लोक फोडून नगदी १९ हजार रुपये व सोन्या चांदीचे दागिने लंपास केल्याची तामसा पोलीस ठाण्यात घटनेच्या माहिती मिळताच तामसा पोलीस यांनी संबंधित घटनेची माहिती श्वान पथक यांना दिले माहितीच्या आधारे नांदेड येथून श्वान पथक तामसाकडे रवाना झाल तामसाला येत असताना पिंपराळा नटराज जिनिंग प्रेसिंग जवळ समोरून येणाऱ्या मोटरसायकल ला वाचवण्याचा प्रयत्नात पोलीस वाहनाचा ताबा नियंत्रण सुटल्याने वळणावर चार फूट खोल खड्ड्यात गाडी गेल्याने गाडीचा भीषण अपघात झाला..

## नांदेड महानगरपालिका क्षेत्रातील शिवसेना पदाधिकारी यांची

# लोकसभा संपर्कप्रमुख किशोर पोतदार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- शिवसेना महानगर प्रमुख प्रकाश मारावार यांच्या नेतृत्वाखाली व नांदेड लोकसभा संपर्कप्रमुख किशोर पोतदार यांच्या प्रमुख उपस्थितीत विसावा हॉटेल येथे संपन्न झाली यावेळी सिडको घरहस्तांतरण विषय राबवुन यशस्वी केल्याबद्दल शिवसेना संघटक प्रमोद मैड यांचा सत्कार करण्यात आला.

या बैठकीला शिवसेना युवा विभागीय सचिव महेश खेडकर,सहसंर्पक प्रमुख दयाल गिरी,उपजिल्हाप्रमुख व्यंकोबा येडे,बालाजी कल्याणकर,महानगरप्रमुख नांदेड दक्षिण मनोज यादव, शहरप्रमुख अर्जुनसिंग ठाकूर, जितुसिंग टाक, ब्रिजलाल उगवे, नवज्योतसिंग गाडीवाले व शहर प्रवक्ता नागनाथ महादापुरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळीं शिवसेना नांदेड संपर्कप्रमुख किशोर पोतदार यांनी प्रभागनिहाय प्रभाग क्रमांक १ ते २० च्या सर्व



पदाधिकारी आडी आडचणी जाणून घेतली.यावेळी सिडको घर हस्तांतरण चा विषय राबवून यशस्वी केल्याबद्दल शिवसेना संघटक प्रमोद मैड यांचा संपर्कप्रमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी नांदेड लोकसभा संपर्कप्रमुख किशोर भाऊ पोतदार यांनी पक्ष एकजूट व एकसंघ आणि वाढीसाठी सविस्तर मार्गदर्शन केले.

या बैठकीचे आयोजन व प्रस्तावना महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी केले.या बैठकीचे सूत्र संचालन शिवसेना नांदेड प्रवक्ता नागनाथ महादापुरे यांनी केले.

बैठकीच्या यशस्वितेसाठी नितीन सरोदे,सचिन पाटील आदींनी प्रयत्न केले.बैठकीला महानगर क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी व बहुसंख्य शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## असर्जनमध्ये महावितरणची मनमानी आणि 'हुकुमशाही' कारभार!

दिवसातून ४ ते ५ वेळा वीज गायब; नागरिक उकाड्याने हैराण, तर अधिकारी-कर्मचारी सुस्तावले

नवीन नांदेड/प्रतिनिधी

जेव्हा मनात येईल तेव्हा लाईट बंद आणि काम चालू, असा मनमानी आणि उद्धट कारभार महावितरणच्या वतीने असर्जन परिसरात सुरू असून, येथील नागरिकांना अघोषित भारनियमनाचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रोज नित्यनियमाने दिवसातून तब्बल चार ते पाच वेळा आणि प्रत्येक वेळी एक ते दोन तास वीज पुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या गलथान कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे.

'तोच बहाणा' आणि अधिकाऱ्यांची टोलवाटोलवी

या सततच्या वीजकपातीबाबत जेव्हा नागरिक महावितरणच्या स्थानिक कर्मचारी व अधिकाऱ्यांना फोन करतात, तेव्हा अमुक-अमुक ठिकाणी फाल्ट आला असून तो दुरुस्त करत आहोत, हे त्यांचे ठरलेले रेडीमेड उत्तर असते. मात्र, जनतेच्या मनात हाच संतप्त सवाल आहे की, जर दररोजच फाल्ट येतो, तर नेमके काम कसे चालले आहे? हा कायमस्वरूपी फाल्ट दुरुस्त का होत नाही?

सध्याच्या कडक उन्हाळ्यात आणि दमट वातावरणामुळे घरातील म्हातारी माणसे, आजारी व्यक्ती आणि लहान मुले प्रचंड उकाड्याने बेजार झाली आहेत. अनेकदा तर तासनतास वीज नसते, ज्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. परंतु, स्थानिक अधिकाऱ्यांना या सामान्य जनतेच्या वेदनेशी काहीही देणेघेणे उरलेले नाही. विशेष म्हणजे, त्रस्त नागरिकांनी वरिष्ठांना फोन करण्याचा प्रयत्न केल्यास ते फोन उचलण्याचे सौजन्यही दाखवत नाहीत.

एका बाजूला सामान्य ग्राहकांना वेळेवर वीज मिळत नसताना, दुसरीकडे अनेक भागात सर्रास वीज चोरी सुरू असल्याची चर्चा आहे. याकडे येथील कार्यालयीन कर्मचारी जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहेत. कर्मचारी व अधिकारी 'तुपाशी' असून यात मोठी मिलीभगत असल्याचा गंभीर संशय नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

या सर्व अनागोंदी कारभाराबाबत येथील लोकप्रतिनिधी आणि राजकीय मंडळी 'हाताची घडी आणि तोंडावर बोट' ठेवून पूर्णपणे गप्प बसली आहेत. जनतेच्या मतांवर निवडून आलेले नेते आज या समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# स्वारातीम विद्यापीठात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

## 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :-

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, उपकुलसचिव रामदास पेद्देवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, प्रा. नंदकुमार बोधगिरे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंतीचे औचित्य



साधून 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा शुभारंभ कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.विद्यापीठ परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन, स्वच्छता व आरोग्याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. विद्यापीठ परिसर, वसतिगृहे, परिसरातील विविध ठिकाणे तसेच दत्तक गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवून समाजामध्ये स्वच्छतेचा संदेश पोहोचवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यापीठ परिसराची स्वच्छता केली. महात्मा गांधी यांच्या स्वच्छता, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांना कृतीतून अभिवादन करण्यात आले.



जालना शेख फारुक :- अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या सत्य अहिंसा व सहिष्णुतेच्या विचारांसह लालबहादूर शास्त्री यांच्या जय जवान जय किसान या ब्रीदवाक्याचे स्मरण करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस म्हणाले की महात्मा गांधी यांनी बलाढ्य ब्रिटिश सत्तेविरुद्ध सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने लढा देत देशाला स्वातंत्र्याच्या दिशेने नेले.

# येरगी ग्रामसभेत व रिफॉर्म उत्सवात केंद्रीय सहसचिव पी. नरहरी यांचा सहभाग

## ग्रामस्थांशी संवाद साधत शाश्वत ग्रामविकासासाठी केले मार्गदर्शन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- केंद्र सरकारचे सहसचिव पी. नरहरी यांनी येरगी येथे आयोजित ग्रामसभा व रिफॉर्म उत्सवात सहभागी होऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामविकासाच्या विविध विषयांवर ग्रामस्थांची मते, सूचना व अनुभव जाणून घेत त्यांनी शासनाच्या योजना आणि उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले.

रिफॉर्म उत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, लोककल्याणकारी उपक्रम आणि प्रशासकीय सुधारणांची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आली. यावेळी नरहरी यांनी विविध शासकीय योजनांच्या लाभार्थींशी संवाद साधून योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळाल्यानंतर त्यांच्या जीवनात झालेल्या बदलांची माहिती घेतली. योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

येरगी येथील बालिका पंचायत उपक्रमाची नरहरी यांनी विशेष दखल घेत कौतुक केले. ग्रामीण भागातील बालिकांना ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे, त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणे आणि निर्णयप्रक्रियेची जाणीव निर्माण करणे, हा उपक्रम अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी नरहरी यांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आली तसेच जलतारा कामांचे भूमिपूजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या



सक्रिय सहभागातून जलसंधारणाची कामे, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत ग्रामविकासाला गती देण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची यावेळी उपस्थिती होती.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत शासकीय योजनांच्या प्रचार-प्रसारासाठी तयार करण्यात आलेले पोस्टर्स, बॅनर्स तसेच विविध शासन आदेशांची मांडणी नरहरी यांनी पाहिली. शासनाच्या योजना व उपक्रमांची माहिती सोप्या आणि प्रभावी पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी करण्यात येत असलेल्या या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

ग्रामसभेस मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी यांच्यासह जिल्हा परिषद स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी, गावस्तरावरील विविध विभागांचे कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामसभेत महिलांचा सहभाग लक्षणीय होता. महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत ग्रामविकासाशी संबंधित विविध विषयांवर आपली मते, सूचना आणि अनुभव मांडले. ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, शासनाच्या योजनांची माहिती आणि स्थानिक पातळीवरील विकासकामांचा आढावा यामुळे येरगी येथील ग्रामसभा व रिफॉर्म उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# आरटीओ साहेब रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी अधिकृत रिक्षा चालकांची नियुक्ती करावी

नवनाथ अण्णा शिराळे पाटील

सध्या बीड ते पुणे रेल्वे सुरू झाली असून शहरांमधून बीड रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी अनेक रिक्षावाले बेसुमार नागरिकांकडून भाडे घेत असून आपली पोळी भाजत आहेत अनेक प्रवाशांच्या हातातील अंगठ्या पैसे पाकीट पैसे भामटे रिक्षावाले चोरटे हिसकावून घेत आहेत रात्रीच्या वेळी काढून घेत असल्याचे सध्या समोर येत आहे याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे आरटीओ साहेब यांनी बीड शहरातील अधिकृत रिक्षावाल्यांना बॅच बिल्ले देऊन पास देऊन त्यांना ड्रेस देऊन असे पंचवीस पास रिक्षावाल्यांना देऊन २५ रिक्षावाल्यांचे अधिकृतपणे



त्यांच्या गळ्यामध्ये आयडी कार्ड देऊन रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी व्यवस्था करावी असे प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील केले आहे तसेच बीड जिल्हा वाहतूक शाखेचे वैभव पाटील साहेब यांनी देखील आपले कर्तुत्व अतिशय उत्कृष्टपणे वाहतूक शाखेच्या माध्यमातून संपूर्ण बंद बीड जिल्ह्यामध्ये वाहतूकची शिस्त काय असते ते दाखवून दिले आहे म्हणून परत एकदा त्यांनी देखील या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे त्यांनी देखील बीड शहरामधून रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या रिक्षा वाल्यांच्या बाबतीमध्ये ते किती भाडे घेतात कशाप्रकारे प्रवाशांना टार्गेट करतात हे पाहणे देखील गरजेचे आहे असे देखील प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी सांगितले आहे .

# रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोरील रस्ता दुभाजक काढून रस्ता मोकळा करा; दुभाजकामुळे रुग्णसेवेला अडथळा

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन; रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र प्रवेशमार्गाची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयासमोरील रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आलेल्या दुभाजकामुळे रुग्णवाहिका तसेच रुग्णांना रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत पोहोचताना अडचणी निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. गंभीर रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करताना वेळ महत्त्वाचा असतो. त्यामुळे रुग्णालयाचा प्रवेशमार्ग अडथळामुक्त ठेवावा, अशी मागणी किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डी जी तांदळे, सामाजिक कार्यकर्ते तथा महा एनजिओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. विशेष म्हणजे यावेळी विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांची उपस्थिती होती रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील दुभाजकाची तातडीने पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी मार्ग खुला करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.जिल्हा रुग्णालय हे बीड शहरासह जिल्ह्यातील नागरिकांसाठी महत्त्वाचे शासकीय रुग्णालय आहे. अपघातग्रस्त, अत्यवस्थ तसेच गंभीर आजारी रुग्णांना उपचारासाठी येथे आणले जाते. अशा परिस्थितीत रुग्णवाहिकेला रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचण्यासाठी अनावश्यक वळसा घ्यावा लागल्यास उपचार सुरू होण्यास विलंब होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संयुक्त पाहणीची मागणी

सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, वाहतूक पोलीस आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी घेऊन रुग्णालय परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा तातडीने आढावा घ्यावा. रुग्णवाहिकांसाठी



२४ तास स्वतंत्र व थेट प्रवेशमार्ग उपलब्ध करून द्यावा. तसेच आवश्यकतेनुसार दुभाजकाचा भाग हटवून रुग्णालयाचा मार्ग अडथळामुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी योग्य दिशादर्शक फलक, वाहतूक नियोजन आणि सुरक्षा उपाययोजना कराव्यात. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

विकासकामे नागरिकांच्या सुविधेसाठी असतात. मात्र रस्त्याच्या नियोजनामुळे रुग्णालयाच्या आपत्कालीन सेवेलाच अडथळा निर्माण होत असेल तर त्याचा तातडीने पुनर्विचार होणे आवश्यक आहे. रुग्णवाहिकेला रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत विनाअडथळा पोहोचता आले पाहिजे, असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

# दारुलउलूमसमोरील धोकादायक वळणावर स्विफ्ट-दुचाकीची जोरदार धडक; दोघे गंभीर जखमी








बीड (प्रतिनिधी) : शहरातील दारुलउलूमसमोरील धोकादायक वळणावर स्विफ्ट कार आणि दुचाकीची जोरदार धडक होऊन दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. धडकेची तीव्रता एवढी होती की, दुचाकी काही फूट अंतरावर फेकली गेली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.दारुलउलूमसमोरील या वळणावर वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच काही वाहने भरधाव वेगाने जात असल्याने या ठिकाणी अपघाताचा धोका कायम आहे. यापूर्वीही या ठिकाणी अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे स्पीड ब्रेकरसह 'वेग कमी करा' आणि 'धोकादायक वळण' असे दिशादर्शक फलक बसविण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती.अपघाताची माहिती मिळताच शेख शकील जमील यांनी नगरसेवक अशफाक इनामदार यांच्याशी संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नागरिकांच्या मागणीची दखल घेत नगरसेवक अशफाक इनामदार यांनी घटनास्थळी पाहणी केली. तसेच नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब भाई यांच्याकडे सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने सूचना दिल्या.

यानंतर शेख मुजीब भाई यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक काम करण्याच्या सूचना दिल्या. अशफाक इनामदार यांच्या पाठपुराव्यानंतर रात्री उशिरा या ठिकाणी स्पीड ब्रेकरचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे धोकादायक वळणावर वाहनांचा वेग कमी होऊन भविष्यातील अपघातांना आळा बसण्यास मदत होणार आहे.दरम्यान, या ठिकाणी स्पीड ब्रेकरसोबतच 'वेग कमी करा' तसेच 'धोकादायक वळण' असे स्पष्ट दिशादर्शक फलकही बसवावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### नगरसेवक अशफाक इनामदार यांची तत्परता!

अपघातानंतर नागरिकांनी नगरसेवक अशफाक इनामदार यांच्याशी फोनवरून संपर्क साधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नागरिकांच्या मागणीची दखल घेत अशफाक इनामदार यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून रात्री ११ वाजताच स्पीड ब्रेकरच्या कामाला सुरुवात करून घेतली. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

# एटीएम कार्ड बदलून सव्वा लाखाची फसवणूक

### एटीएम कार्ड बदलून सव्वा लाखाची फसवणूक भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील वाकोडी फाटा येथील स्टेट बँक परिसरामध्ये एका नागरिकाची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही फसवणूक झाल्याचे पोलीस अहवालावरून स्पष्ट झाले आहे.

फिर्यादी देवराम हरीभाऊ गायकवाड यांच्या नातेवाईकाचे एटीएम कार्ड हातचालाकीने बदलण्यात आले. दिनांक ७ सप्टेंबर २०२६ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ही घटना घडली. अनोळखी भामट्याने एटीएम कार्ड बदलून खात्यामधून वेळोवेळी पैसे लांबवले. विविध ठिकाणांहून एकूण १ लाख १० हजार ५०० रुपयांची रोकड काढून घेण्यात आली आहे. या प्रकरणी फिर्यादी देवराम गायकवाड यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद नोंदवली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक थोरात यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. बँक किंवा एटीएम केंद्रावर पैसे काढताना नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांकडून केले जात आहे. अनोळखी व्यक्तीची मदत घेणे टाळावे आणि सतर्क राहावे, असे पोलिसांनी सुचवले आहे.

# जंतरमंतरवरील आंदोलनात ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन अध्यक्ष नेहा बोरा ताब्यात

७०० हून अधिक आंदोलकांवर पोलिसांची कारवाई

नवी दिल्ली : विशेष मतदार यादी पुनरिक्षण ( एसआयआर ) प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी शुक्रवारी जंतरमंतर परिसरात विद्यार्थी संघटनांनी आंदोलन केले. या आंदोलनात ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन , स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया , नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया यांसह विविध विद्यार्थी व युवा संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांच्यासह मोठ्या संख्येने



आंदोलकांना ताब्यात घेतले. बोरा यांना पोलिस बसमध्ये नेण्यात आल्याचे दृश्य समोर आले. विविध वृत्तसंस्थांच्या वृत्तानुसार, दिवसभरात ५०० ते ७०० हून अधिक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले; वेगवेगळ्या वेळेतील पोलिस कारवाईमुळे आकडेवारीत फरक आहे.

आंदोलकांनी एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदारांच्या नावांची नोंद, वगळणे आणि मतदार यादीच्या पुनरिक्षणासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. या कथित अनियमिततेची जबाबदारी निश्चित करून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी आंदोलकांची मागणी होती. हे आरोप आंदोलकांनी केले असून, निवडणूक आयोगाने गैरप्रकाराचे आरोप फेटाळले आहेत आणि प्रक्रिया नियमानुसार झाल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारल्याचे वृत्त आहे. जंतरमंतर आणि मध्य दिल्ली परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलकांना पोलिस बसमधून विविध पोलिस ठाण्यांमध्ये नेण्यात आले. एसएफआयच्या मोठ्या संख्येने आलेल्या कार्यकर्त्यांनाही पोलिसांनी रोखून ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे.

# 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमातून बीड शहरात भव्य स्वच्छता अभियान

स्वच्छ बीड, सुंदर बीड'साठी नागरिकांनी एकत्र येण्याचे नगराध्यक्ष प्रेमलतताई पारवे यांचे आवाहन






बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात 'स्वच्छता हीच सेवा' अभियानांतर्गत भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश देत विविध भागांत स्वच्छता करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष प्रेमलतताताई पारवे म्हणाल्या की, 'स्वच्छ बीड, सुंदर बीड' घडवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन महात्मा गांधीजींच्या स्वच्छतेच्या संदेशाचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. नागरिकांनी स्वच्छतेला केवळ अभियानापुरते मर्यादित न ठेवता दैनंदिन जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या स्वच्छता अभियानात बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी, स्वच्छता सभापती शेख निजाम, शेख मुजीब भाई, नगरसेवक नागेश तांबारे, तिडके अण्णा यांच्यासह नगर परिषद कर्मचारी, पदाधिकारी व नागरिकांची उपस्थिती होती. अभियानादरम्यान विविध ठिकाणी स्वच्छता करून परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करण्यात आली.